महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य ३/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः १७, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार २३ जुलै २०२४ ते सोमवार २९ जुलै २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

राज्यात आणखी पाच दिवस मुसळधार पाऊस

चंद्रपुरात पावसाचा रुद्रावतार! शेकडो घरं पाण्याखाली, अनेक जनावरे दगावली, जनजीवन विस्कळीत

मधल्या काळात पावसानं दांडी दिल्याने विदर्भातील शेतकऱ्यांची चिंता वाढवली होती. मात्र गेल्या दोन दिवसात उपराजधानी नागपूरसह पूर्व विदर्भाला अक्षरक्षः झोडपून काढले आहे. सध्या पूर्व विदर्भात सुरू असलेल्या धुव्वाधार पावसाने सर्वत्र एकाच दाणादाण उडवली आहे. अतिवृष्टी सदृश्य पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं असून शहरातील रस्त्यांना नदी नाल्याचे स्वरूप प्राप्त झालं आहे. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात या पावसानं कहर केल्याचे बघायला मिळाले आहे. चंद्रपूर-मूल मार्गावरील चिचपल्ली गावातील गावतलाव फुटल्याने गावातील अंदाजे १०० ते १५० घरांमध्ये पाणी शिरले आहे.

■ मुंबई : विशाल कारंडे

सलग दोन दिवस पाऊस झाल्याने गावतलावातील पाण्यात मोठी वाढ झाली. दरम्यान आज पहाटे तलावाची पाळ फुटून गावात पाणी शिरले आहे. परिणामी गावातील ग्रामस्थांचे धान्य आणि इतर साहित्याचे मोठं नुकसान झाले आहे. सोबतच गावातील जवळपास १०० बकऱ्या आणि इतर जनावरं देखील या पुरात दगावले आहेत.

अनेक घरं पाण्याखाली, शेकडो जनावरे दगावली

उपराजधानी नागपूरसह विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना शनिवारच्या सकाळपासून कोसळणाऱ्य मुसळधार पावसाने धो- धो धुतलंय. दरम्यान अजून देखील काही भागात पावसाचा जोर कायम असून संभाव्य पावसाचा धोका लक्षात घेता योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन स्थानिक प्रशासन आणि हवामान विभागाच्या (घ्ऊ) वतीने केले आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका पूर्व विदर्भाला बसला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील चिचपल्ली गावातील गावतलाव फुटल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. अचानक आलेल्या या पाण्यामुळे शेकडो घरं पाण्याखाली गेली आहे. यात अनेक जनावरे देखील दगवली आहे. तर शेतकऱ्यांनी शेतीसाठी घरात आणून ठेवलेले खत आणि बी-बियाणेही पाण्यात भिजली आहे. एकुणात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि वित्त हानी झाल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रात पडत असलेल्या अतीमुसळधार पाऊसामुळे कुठे ही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी सर्व यंत्रणांना सतर्क रहाण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, राज्यातील सर्व महापालिका आयुक्त आणि आप्तकालिन यंत्रणांच्या प्रमुखांशी फोनवरून चर्चा केलीय. सर्व यंत्रणांना सतर्क रहाण्याचा आदेश यावेळी देण्यात आला आहे.

(शेष पृष्ठ ७ वर)

यलो अलर्टः मुंबई, पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर.

ऑरेंज अलर्टः रायगड, रत्नागिरी, सातारा, भंडारा

संक्षिप्त

प्रचंड हिंसाचारानंतर बांगलादेशमधील सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

■ बांग्लादेशः वृत्तसंस्था

बांगलादेश मध्ये आरक्षणाच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनात प्रचंड हिंसाचार पाहायला मिळाला. दरम्यान, हिंसाचार झाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय घेतलाय. बांगलादेशमधील बहुतांश नोकऱ्यांमधील आरक्षण रद्द करण्यात आले आहे. शिवाय, सरकारी नोकऱ्यांची भरती गुणवत्तेनुसार केली जाणार असल्याचेही सुप्रीम कोर्टाने निकालात म्हटलंय.

बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांमथील आरक्षणाची पद्धत बंद करण्यात यावी, या मागणीसाठी हिंसक आंदोलन सुरुच होते. गेल्या काही आठवड्यांमध्ये झालेल्या हिंसक आंदोलनामध्ये १०५ लोकांचा बळी गेलाय. कायदा व सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी राष्ट्रव्यापी कर्फ्यू लागू केला. त्यानंतर नियंत्रण मिळवण्यासाठी लष्करही मैदानात उतरवण्यात आले होते. आत्तापर्यंत २५०० पेक्षा जास्त आंदोलक पोलिसांमध्ये झालेल्या झटापटीत जखमी झाले आहेत. शिवाय देशातील अस्थिर परिस्थितीमुळे इंटरनेट सेवा देखील बंद करण्यात आली आहे.

घाऊक बाजारात टोमॅटो प्रतिकिलो ८० ते १०० रुपयांवर

■ मुंबई : यश सावंत

एपीएमसीत पर राज्यांतून आणि राज्यातून होणारी टोमॅटोची आवक कमी झाल्याने टोमॅटोचे भाव वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. बाजारात सध्या ३३ गाड्या एवढीच आवक होत असून दरात प्रतिकिलो २० रुपयांनी दरवाढ झाली आहे. आधी ८०-१०० रुपयांनी उपलब्ध असलेले टोमॅटोचे दर आता ८०-१०० रुपयांवर पोहोचले

आहेत. वाशीतील एपीएमसी बाजारातच टोमॅटो कमी प्रमाणात दाखल होत आहेत. घाऊक बाजारामध्येच ८०-१०० रुपये प्रतिकिलो या दराने विक्री होत आहे. मागील आठवड्यात किरकोळ बाजारात १०० रुपये प्रतिकिलो मिळणारे टोमॅटो १२० रु. प्रतिकिलोने विकले जात आहेत. बंगळूरुमधून होणारी टोमॅटोची आवक पूर्णतः बंद असून नाशिक, सांगली येथील आवक असून कमी माल दाखल होत आहे. त्यामुळे एपीएमसी बाजारात आवक कमी झाली आहे, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. एपीएमसी बाजारात बुधवारी अवघ्या ३३ गाड्याच दाखल झाल्या असून १८०४ क्विंटल टोमॅटो आवक झाली आहे. निम्मीच आवक झाल्याने टोमॅटोच्या दराने उसळी घेतल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

'देशाच्या पंतप्रधानांचा गळा घोटण्याचा....', अधिवेशन सुरु होण्याआधी पंतप्रधान मोदींचं मोठं वक्तव्य

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

'मी हे दुःखाने बोलतोय, २०१४ नंतर काही खासदार पाच वर्षांसाठी आले, काही १० वर्षांसाठी आले. पण असे बरेच खासदार होते, ज्यांना आपल्या मतदारसंघासाठी बोलण्याची संधी मिळाली नाही. आपल्या विचारांना संसेदत समृद्ध करण्याची संधी मिळाली नाही. कारण काही पक्षांच्या नकारात्मक राजकारणामुळे देशच्या संसेदचा महत्त्वपूर्ण वेळ, एक प्रकारे आपलं राजकीय अपयश झाकण्यासाठी दुरुपयोग केला' अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली. 'मी सर्व पक्षांना आग्रह करतो की, कमीत कमी जे खासदार पहिल्यांदा संसदेत निवडून आलेत, त्यांना संधी द्या, त्यांना त्यांचे विचार व्यक्त करु द्या लोकांना पुढेच यायची संधी द्या' असं अपील पंतप्रधान मोदी यांनी केलं. तुम्ही पाहिलं असेल नवीन संसद स्थापन झाल्यानंतर पहिलं सत्र होतं. १४० कोटी देशवासियांनी बहुमताने ज्या सरकारला सेवा करण्याचा आदेश दिला. त्याच आवाजाला चिरडण्याचा, अलोकतांत्रिक प्रयत्न झाला. अर्डीच तास देशाच्या

पंतप्रधानांचा गळा घोटण्याचा, त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला. लोकशाही व्यवस्थेत अशा गोष्टींना स्थान नाही. ज्यांनी हे केलं, त्यांना याचा पश्चाताही नाहीय. मनात वेदना सुद्धा नाहीयत. देशवासियांनी आम्हाला देशासाठी पाठवलय. पक्षासाठी पाठवलेलं नाही. हे सभागृह पक्षासाठी नाही, देशासाठी आहे. १४० कोटी देशवासियांसाठी हे सभागृह आहे' असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.'सर्व खासदार पूर्ण तयारीनिशी चर्चेला समृद्ध करतील. कितीही विरुद्ध विचार असतील, विरुद्ध विचार वाईट नसतात, नकारात्मक विचार वाईट असतात. देशाला नकारात्मकतेची आवश्यकता नाही. देशाला एका विचारधारेची, प्रगती विकास विचारधारेची, देशाला नव्या उंचीवर घेऊन जाणाऱ्या विचारधारेची आवश्यकता आहे. लोकशाहीच्या या मंदिराचा सामन्यात माणसाच्या आशा, अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सकारात्कम उपयोग करु' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सरकारचा कोणताही विचार नाही; केंद्र सरकारची लेखी उत्तरात माहिती

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

लोकसभा निवडणुकांत खासदारकीची माळ गळ्यात पडल्यानंतर सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सभागृहात पहिलाच प्रश्न जुन्या पेन्शन संदर्भाने विचारला होता. निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. यासंदर्भाने सरकारी

कर्मचाऱ्यांना मोठं आंदोलनही उभारलं होतं, त्यावेळी राज्य सरकार याबाबत काम करत असून निश्चित मार्ग काढू असे राज्य सरकारने कळवले आहे. मात्र, अद्यापही राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शनचा लाभ मिळत नाही. तर, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांचीही तीच मागणी आहे. त्याच अनुषंगाने खासदार प्रणिती शिंदेंनी जुनी पेन्शन योजना संदर्भात संसदेत प्रश्न विचारला. पण, केंद्र सरकारने स्पष्ट शब्दात नकार दिल्याने कोट्यवधी कर्मचाऱ्यांची निराशा झाली आहे. जुन्या पेन्शनसाठी लढा देणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी निराशाजनक बातमी आहे. कारण, जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सरकारचा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट शब्दात केंद्र सरकारने खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे. जुन्या पेंशन योजनेबाबत काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकारला प्रश्न विचारला होता. राज्य व केंद्रातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना सुरू करण्यासाठी सरकारची काही योजना आहे का?, असा प्रश्न प्रणिती शिंदे यांनी संसद सभागृहातील उपस्थितीदरम्यान विचारला. मात्र, यासंदर्भातील प्रश्नावर सरकारने दिलेल्या उत्तराने कोट्यवधी सरकारी कर्मचाऱ्यांची निराशा होणार आहे. जुन्या पेंशन योजनेबाबत सरकार चा कोणताही विचार नाही, असे स्पष्ट उत्तर केंद्र सरकारने दिले आहे. त्यामुळे, गेल्या अनेक वर्षापासून जुन्या पेन्शन योजनेबाबत आक्रमक असलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांची घोर निराशा झाली आहे. आता, सरकारी कर्मचारी पुन्हा आंदोलनाचा किंवा संपाचा मार्ग अवलंबतात का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

(शेष पृष्ठ ७ वर)

मराठा समाजाला मोठा दिलासा! मनोज जरांगेची 'ती' मागणी मुख्यमंत्री शिंदेनी केली मान्य

■ मुंबई : नितीन देवळेकर

मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाला सुरुवात केली आहे. अंतरवाली सराटीमध्ये त्यांचे हे उपोषण सुरु आहे तर दुसरीकडे विधानसभा निवडणुका तोंडावर आल्याने सरकारकडून हालचालींना वेग आला आहे. यादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. तसेच त्यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या काही मागण्या मान्य केल्या आहेत. २०२४-२०२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश

घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

(शेष पृष्ठ ७ वर)

'मनोज जरांगेंसाठी लाडका आंदोलक योजना आणा', लक्ष्मण हाकेंचा खोचक टोला

■ मुंबई : सम्यक कासारे

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. त्यासाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केलं. आता मराठा समाजाच्या आरक्षणासाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरु केलं आहे. दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नांसदर्भात लक्ष्मण हाके यांनी जनआक्रोश यात्रा सुरु केली आहे. त्यामुळे मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न पुन्हा तापला आहे. लक्ष्मण हाके यांनी आज जनआक्रोश यात्रेदरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शरद पवार यांच्यासह मनोज जरांगे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला. 'मनोज जरांगेंसाठी सरकारने लाडका आंदोलक योजना आणावी', असा खोचक टोला लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांना लगावला. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनासंदर्भात बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, 'मनोज जरांगे पाटील यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते. कारण २७ टक्के ओबीसी आरक्षणामध्ये ३.५ टक्के हिस्सा हा धनगर समाजाचा आहे. आज आमचे तरुण कुठेतरी शासकीय नोकऱ्यांमध्ये येऊ पाहत आहेत. पण या लोकांना कोणी सांगितलं की धनगर बांधव ओबीसी आरक्षणाच्या बाहेर आहेत. हे फक्त आरक्षणाचे कप्पे आहेत.

(शेष पृष्ठ ७ वर)

मुंबईकरांनो, 'बेस्ट' बचाओ..! आजपासून मोहीम; 'क्यूआर कोड'द्वारे सूचना पाठविण्याचे आवाहन

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

राज्य सरकारच नव्हे, तर महापालिकेनेही ठेंगा दाखविल्याने अडचणीत आलेल्या 'बेस्ट'ला वाचविण्यासाठी आता मुंबईकरांनीच एकत्र येऊन आवाज उठविण्याचा निर्धार केला आहे. प्रवासी संघटना, सामाजिक संघटना आणि बेस्ट संघटनांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. 'बेस्ट'चा स्वमालकीच्या बसचा ताफा केवळ ३३ टक्के उरला आहे. 'बेस्ट' वाचवण्यासाठी या आठवड्यापासून प्रत्येक स्थानकावर क्यूआर कोड लावण्यात येणार आहेत. त्याद्वारे सामान्य मुंबईकरांच्या सूचना व सल्ले तसेच संकल्पना एकत्रित करण्यात येतील. त्यानंतर बेस्ट बचाव मोहिमेसाठी नियोजन आखण्यात येणार असल्याची माहिती बेस्ट वर्कर्स युनियनचे सरचिटणीस शशांक राव यांनी दिली. मुंबईतील दररोज तब्बल ३१ लाख प्रवाशांना आपल्या इच्छितस्थळी सुरक्षित पोहोचविणाऱ्या व मुंबईच्या प्रवासी वाहतुकीचा कणा असणाऱ्या 'बेस्ट'ला वाचविण्याची मोहीम युनियनमार्फत हाती घेण्यात आली आहे. यासंदर्भातील पहिली बैठक गोरेगावात झाली. १) बेस्ट बसची सेवा सुरळीत चालावी यासाठी बेस्टच्या ताफ्यात एकूण ३,३३७ बसची गरज आहे; मात्र केवळ १,०८५ बस बेस्टच्या स्वतःच्या मालकीच्या आहेत. २) त्यापैकी ७६१ बस ३१ मार्च २०२५ रोजीपर्यंत भंगारात निघणार आहेत. त्यानंतर बेस्टच्या बसची संख्या आणखी घटणार आहे. त्यामुळे बेस्टसाठी नव्या बस टप्प्याटप्प्याने खरेदी करून प्रवासी सेवेत आणणे व त्यासाठी

भरीव आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे. ३) खासगी बसवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही; तसेच खासगी बसची नियमित देखभाल-दुरुस्तीही होत नसल्याचे अनेकवेळा समोर आले आहे. त्यामुळे बेस्टच्या स्वमालकीच्या बस ताफ्यात असणे आवश्यक असल्याचे बेस्टसाठी लढा देणाऱ्या संघटनांनी मंडला आहे. अशी आहे मुंबईकरांची 'बेस्ट'-

१) दररोज प्रवासी- ३१ लाख

२) स्वतःच्या बस - १,०८५

३१ मार्च २०२५ पर्यंत ७६१ बस भंगारात निघणार. बेस्टला वाचविण्यासाठी नव्या बसची खरेदी, हाच एकमेव पर्याय. मागील सहा वर्षांपासून आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या 'बेस्ट'चे पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणत्याही प्राधिकरणाने ठोस पुढाकार घेतलेला नाही. राज्य सरकार व महापालिका प्रशासनाने हा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळेच आम्ही मुंबईकरांच्या दरबारात जाऊन जनजागृती करण्याचे ठरविले आहे. मुंबईकरांना किफायतशीर दरात चांगली व दर्जेदार सेवा पुरविणे हा बेस्टचा मूळ उद्देश असला, तरी त्याचा महापालिका प्रशासनाला सोयिस्कर विसर पडल्याचे शशांक राव यांनी सांगितले.

बेस्टच्या ताफ्यातील खासगी बस वेळेवर धावत नाहीत. खासगी बसमध्ये अनेकदा तांत्रिक बिघाड होतो. त्याकडे वेळेवर लक्ष दिले जात नाही. त्याचा प्रवाशांना फटका बसतो. उत्तम सेवा मिळण्यासाठी, बेस्टचा स्वमालकीचा ताफा वाढणे गरजेचे आहे. पालिका आणि सरकारवर दबाव आणण्यासाठी मुंबईकरांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मुंबईतील प्रवासी संघटना, सामाजिक संघटना यांना एकत्र करून 'बेस्ट बचाओ' अभियान राबविले जाणार आहे.

- शशांक राव, सरचिटणीस, बेस्ट वर्कर्स युनियन

ध्यास, श्वास आणि विश्वास

भा रतीय जनता पक्ष म्हणजे खंडप्राय भारताचा समकालीन राजकीय आविष्कार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे एक सुप्रसिद्ध विधान सांगतो. पंडितजी म्हणायचेः विविधतेत एकता किंवा एकतेचे विविध रुपांमधील प्रकट होणे हा भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी असलेला विचार आहे. जनसंघ ते जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनलेला भारतीय जनता पक्ष या साऱ्या प्रवासात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा हा विचार आमची विचारधारा बनली.

भाजप सर्वसामान्यांचा पक्ष आहे, म्हणजे काय? तर देशाच्या वेगवेगळ्या भागांतील वेगवेगळ्या समाजधारणा घेऊन आलेल्या लोकांनी एकत्रितपणे विणलेला, बांधलेला आणि भक्कम केलेला हा पक्ष आहे. आमच्या विविधतेत एकता आहे आणि आमच्या एकतेचे रुप काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि ईशान्येपासून गुजरातपर्यंत विविध रुपांमध्ये प्रकट होते आहे. सर्वसामान्य भारतीयांमध्ये जी विविधता आहे ती भाजपमध्ये आहे. भारत म्हणून जी एकता आहे, अखंडता आहे ती भाजपमध्ये आहे. म्हणूनच भाजप हा संपूर्ण भारताचा राजकीय आविष्कार आहे, असे मला वाटते.

एकजुटीची, अखंडतेची भावना

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन पुण्यात बालेवाडीत होत आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते अधिवेशनात सहभागी होत आहेत. या साऱ्यांसमोर एकच लक्ष्य आहे. एकच उद्देश आहे आणि तो म्हणजे भाजपच्या एकता, अखंडता आणि विविधतेत साऱ्या राज्याला सामावून घेणे. हे सारे कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या धारणा घेऊन आले आहेत. त्यामध्ये विविधता आहे. मात्र, साऱ्यांमध्ये एकता आहे ती राष्ट्राप्रति, आपल्या पक्षाप्रति. भाजप या तीन अक्षरांभोवती त्यांची एकता सामावली आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात दीर्घकाळ वावरल्यानंतर मी खात्रीने सांगू शकतो, ही या प्रकारची एकजुटीची, अखंडतेची भावना

जगाच्या इतिहासात दुसरीकडे कुठे सापडणार नाही. परस्परांविषयी बांधिलकी, आपुलकी आणि साऱ्यांनी मिळून एकत्रितपणे राष्ट्राच्या कल्याणाचा विचार करण्याची अशी परंपरा भाजपशिवाय अन्यत्र कुठे आढळणार नाही. या एकतेत ताकद आहे. ही ताकद नवी आव्हाने लीलया पेलण्याचे सामर्थ्य कार्यकर्त्यांना देते, भाजपला देते.

भाजपचा संघर्ष कशासाठी?

लोकसभा निवडणुकीचे आव्हान नुकतेच भाजपने याच ताकदीवर पेलले. देशाच्या इतिहासात नरेंद्र मोदी यांचे नाव सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून कोरले गेले. राजकारणात कोणताच दिवस सोपा नसतो. कोणतीच निवडणूक विनासायास नसते. त्यातही, जेव्हा भारतीय संस्कृतीशी घट्ट बांधलेला भाजप राजकारण करू पाहतो, तेव्हा त्याला विरोध होणार हे स्वाभाविकच असते. हा विरोध आम्ही कसा पाहतो? मला सांगायला अभिमान वाटतो, की भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता, नेता संघर्षातून तयार झाला आहे. त्यामुळे, भाजपचा सर्वसामान्य कार्यकर्त्याही संघर्षातून मागे हटत नाही. संघर्ष कशासाठी याची त्याला पूर्ण जाणीव आहे. भाजपचा संघर्ष राष्ट्रहितासाठी, देशविकासासाठी आहे. देशातील प्रत्येक राज्याच्या विकासासाठी आहे. राज्यातील प्रत्येक गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आहे. अंतिमतः प्रत्येक भारतीयांच्या, प्रत्येक मराठीजनाच्या प्रगतीसाठी हा संघर्ष आहे.

मतदारांचा भाजपला वाढता पाठिंबा

भाजप संघर्ष करतो आणि देश विकासाच्या वाटेवर एक पाऊल पुढे टाकतो. महाराष्ट्राचा मतदार या संघर्षाचा सतत सन्मान करतो आहे. भाजपच्या पारड्यात दर निवडणुकीत अधिक मतांची भर टाकतो आहे. १९९०च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे महाराष्ट्रात ४२ आमदार निवडून आले, तेव्हा त्यांना मतदारसंघातील २९.९६ टक्के मिळाली होती. भाजपचा कार्यकर्ता, नेता संघर्ष करत राहिला. १९९५ मध्ये आमचे आमदार ६२ झाले आणि लढविलेल्या प्रत्येक जागेवरील ३२.१६ टक्के भाजपला मिळाली. १९९९ मध्ये आमच्या मतांची टक्केवारी ३५.४२ टक्के झाली. अगदी अलीकडच्या २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आमचे १०५ आमदार निवडून आले, तेव्हा भाजपच्या पाठीशी त्या त्या मतदारसंघातील ४४.५१ टक्के मतदार उभा होता. अनेकांना प्रश्न पडतो, की भाजपच्या मतदारांची टक्केवारी वाढते आहे, म्हणजे काय आहे. तेव्हा हे आकडे वाढत्या पाठिंब्याचा पुरावा आहेत. भाजप प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पूर्ण ताकदीनिशी आपला पाठिंबा वाढवतो आहे. महायुतीमधील प्रत्येक पक्षाच्या पाठीशी भाजपचा मतदार निःसंदिग्धपणे उभा राहतो आहे.

महाराष्ट्र भारताच्या विकासाचे इंजिन

यंदाच्या भाजपच्या अधिवेशनाचे सूत्र आहे ध्यास, श्वास आणि विश्वास. विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या प्रत्येक भाजप कार्यकर्त्याचेही हेच सूत्र आहे. आम्हाला ध्यास आहे, महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेण्याचा. आमच्या पक्षाचा झेंडा अभिमानाने उंचावण्याचा आम्हाला ध्यास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखवलेल्या विकसित भारताच्या मार्गावर महाराष्ट्राला नेण्याचा आम्हाला ध्यास आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक माणूस, मग तो कष्टकरी, शेतकरी आहे, आमच्या माता-भगिनी आहेत, उद्याचा महाराष्ट्र घडवणारे तरुण-तरुणी आणि आम्हाला सतत मार्गदर्शन करणारे ज्येष्ठ आमचा श्वास आहेत. भाजपचा कार्यकर्ता हा पक्षाचा श्वास आहे आणि भाजपच्या विजयासाठी कार्यकर्त्याचा प्रत्येक श्वास आहे. आमचा आमच्या संघर्षशीलतेवर विश्वास आहे. आमचा आमच्या पक्षाच्या विचारधारेवर, नेतृत्वावर, मार्गदर्शकांवर ठाम विश्वास आहे. आम्हाला विश्वास आहे, की आमचा महाराष्ट्र भारताच्या विकासाचे इंजिन आहे आणि हे इंजिन भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार सक्षमपणे सांभाळणार आहे, यावर महाराष्ट्राचा विश्वास आहे. त्यामुळेच, आम्हाला विजयाचा विश्वास आहे.

नका हो, शाळा बंद करू!

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे सरकारचे धोरण आहे. ते लक्षात घेऊन शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवायला हवे. सरकारने शाळा बंद करू नयेत. त्याऐवजी विद्यार्थ्यांची उपलब्धता आणि त्यांची गुणवत्तावाढ यावर भर देऊन शाळांना सक्षम करावे.

शिक्षणाची गंगा घरापर्यंत, दारांपर्यंत पोहोचविण्याचे धोरण हे कधीही स्वागतार्हच म्हणावे लागेल. आपल्या ग्रामीण महाराष्ट्रासाठी अशा धोरणाची निकड आहे. ज्ञानोपासनेचा तसेच निर्माण होणाऱ्या या संधींचा विचार हा तर सतत आपल्या शिक्षणाच्या केंद्रवर्ती राहिला. आता ज्ञानोपासना किती होते आणि संधी कितीशा उपलब्ध होतात; हा पुन्हा चिंता, चिंतनाचा निराळा मुद्दा.

पण, शाळा बंद होऊ नयेत; याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. 'महाराष्ट्रातील हजारो शाळा बंद होणार', अशी एक बातमी वाचण्यात आली आणि शिक्षणप्रेमींना, एकंदर पालकांनाही ही बातमी वाचून धक्काच बसला. असा धक्का बसणं, हे स्वाभाविकही होते. वास्तवाचा विस्तव नीट समजून घ्यायला हवा.

राज्यात जिल्हा परिषदा काय किंवा नगर परिषदा काय किंवा खासगी काय, या विविध विभागांच्या हजारो शाळा चालतात. यात, काही म्हणजे खूप शाळा जनावरांचे गोठे बरे; त्यापेक्षाही हलाखीच्या स्थितीत चालतात. त्यांना 'ज्ञानोपासना' एवढा शब्द केवळ ठाऊक असावा. परंतु एकुणात ज्ञान, कला, गुण, कौशल्ये ही त्या शाळांमध्ये निदान औषधाला तरी असतील का? इतपत शाळांची स्थिती ही ढासळलेली आहे. तरीही शाळा बंद होऊ नयेत, ही समाजभावना दुर्लक्षिता येणारी नाही.

ग्रामीण महाराष्ट्रात तर सरकारच्याच शाळा लोकांनाही परवडतात. कारण, तेथील पाल्य-पालक यांना शुल्क किंवा पाठ्यपुस्तकांची फारशी झळ बसत नाही. शिक्षण सर्वापर्यंत सढळ पोचविण्याचा सरकारचा यामागचा हेतू हिताचाच आहे. मग, तरीही अशा स्थितीत जिल्हा परिषदेच्या, नगर परिषदेच्या तसेच खासगी हजारो शाळा बंद होण्याची घंटा जर गंभीरपणे वाजणार असेल तर समाज, लोक, शिक्षण अस्वस्थ होणं पण स्वाभाविकच आहे.

या बातम्यांमधून शाळा बंद होणार असल्याची जी आकडेवारी आणि त्याची व्याप्ती पुढे येते, ती पण समाजाची चिंता वाढविणारी आहे. मराठवाडा, विदर्भासह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, कोल्हापूर या पट्ट्यांतील बंद होणाऱ्या शाळांची संख्या काही हजारांच्या घरात जाणारी आहे. खानदेशातील शाळाही त्याला अपवाद ठरणार नाहीत. अशीच परिस्थिती पुणे परिसरातील शाळांची आहे. अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्याचा काही भाग आदिवासी आणि दुर्गम आहे.

तेथे आश्रमशाळाही आहेत. या दोन्हीही जिल्ह्यातील काहीशे शाळा बंद होण्याच्या छायेत आहेत. थोडक्यात काय तर, पुणे, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा

आणि विदर्भ म्हणजेच एकुणात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील बंद होऊ पाहणाऱ्या खासगी, जिल्हा परिषद आणि नगर परिषदांच्या शाळांची संख्या काही हजारांचा आकडा गाठणारी आहे. हे सगळे आकडे अस्वस्थ करणारे आणि चिंता वाढविणारे आहेत.

मग, या शाळा कशा टिकवायच्या? विद्यार्थी पटसंख्या कशी वाढवायची? शिक्षक जिथे नोकऱ्या करतील; तिथेच मूळ ठिकाणी त्यांना राहायला हवे. यावरच्या काय उपाययोजना? याशिवाय, तेथील शाळा इमारतींच्या बांधकामांचे, सुविधांचे, साधनांचे, स्वस्तात उत्तम प्राप्त शिक्षण देण्याचे मुद्दे शाळांसमोर दत्त म्हणून उभे पुन्हा आहेतच.

'शाळा वाचवा-शाळा चालवा' ही मोहीम एकूण जनता दरबारांतून वेगाने सुरू व्हायला हवी. ज्यामुळे, बंद होऊ पाहणाऱ्या शाळांच्या घंटा कायम निनादत, घुमत राहतील. शिक्षणाची दारं बंद होणं, हे कोणालाच मुळात परवडणारं नाही. 'वस्ती तिथे शाळा' हा नारा तसा जुना आहेच. अशा स्थितीत कुठलीही कारणं देऊन शाळा मात्र बंद होता कामा नयेत; हा आवाज समाजांतून शाबूत राहावा.

शाळा टिकवून राहण्यासंबंधीचा घोशा लोकांना उचलून धरावा. ही शाळाबंदीची धोक्याची घंटा जनतेच्या कानांपर्यंत अर्थातच पोहोचली आहे. विदर्भामधून शाळा बचाव समित्यांची पण स्थापना होऊ लागली आहे. तसेच लोकांमध्ये जाऊन मग अशा समित्या जनजागृतीही करू पाहात आहेत. वस्तुतः अशा प्रकारचे आवाज सार्वत्रिक, सार्वजनिक पण झाले पाहिजेत! कारण, शाळांमधून दिले जाणारे शिक्षण हे पाया रचणारे शिक्षण आहे.

अशाच शिक्षणातून संस्कारांची मूळ पेरणी पण होत असते. शिवाय, अशा स्वरूपाचे शाळा शिक्षण हे एकाचवेळी जसे विद्यार्थीशिक्षण असते, तद्वतच ते ग्रामशिक्षण देखील असते. त्यामुळे, कोणत्याही शाळा समाप्त होता कामा नयेत; असाच सामाजिक जनस्वर असतो, यात मुळीच शंका नाही. हा जनस्वर सैल होऊ द्यायला नको; हे पण तेवढेच खरे!

सर्वांगीण विकासासाठी...

मुळात शाळा म्हटले की, स्वच्छता आणि शिक्षण हे विषय अर्थातच अग्रक्रमावर मानावेच लागतात. तिथे असणारा पाणीपुरवठा, खेळांची मैदाने, कौशल्यपूरक साधने, खेळांची साधने या सर्व गोष्टी महत्त्वाच्या नव्हे; तर अनिवार्य असतात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे योगदान मोलाचे असते.

शाळांमध्ये पाठ्यपुस्तकं आणि परीक्षा यांना अंतिम तसेच निर्णायक स्थान एकमेव म्हणून द्यावयाचे काहीच कारण नाही. अर्थात पुस्तके व परीक्षा महत्त्वाची आहे; असेल. पण भावना आणि विचार यांची पण जिवंत ओल त्यापेक्षा महत्त्वाची आहे. त्यामुळे, शाळा जगल्या पाहिजेत; मुलं शिकलीच पाहिजेत.

उच्च शिक्षणासंबंधी भाष्य करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकरांच्या प्रतिपादनाची इथे मुद्दाम आठवण करून देतो. ते म्हणतात, 'एखाद्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला कला, विज्ञान, संगीत, संगणक अभ्यासक्रमांतील सर्व विषय हे एकाचवेळी अध्ययन करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला पाहिजे.'' डॉ. काकोडकरांनीच पुढे अशी रुखरुख व्यक्त केली; जी आपणांस अंतर्मुखच करते.

ते म्हणतात, 'केवळ गुणांक आणि पदवी मिळविण्याच्या दृष्टीने घेतलेल्या शिक्षणामुळे देशात साठ टक्के विद्यार्थी नोकरीसाठी अपात्र होत असल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.' म्हणजेच, खुल्या शिक्षणासोबतच स्वेच्छेनुसार आनंददायक शिक्षणही जास्त महत्त्वाचे असते.

मुळात शाळा असो की त्यापुढचे कोणतेही शिक्षण हे उत्तम तर हवेच. कारण, हे युग स्पर्धेचे आहे. हे युग गुणवत्तेची मागणी करणारेही आहे. तेव्हा, उत्तम चालविण्याची जणू प्रतिज्ञा करून या शाळा सुरूच राहायला हव्यात. पुरोगामी, ग्रामीण महाराष्ट्राकरिता 'शाळा बंद' अशी घंटा घणघणायला नको...!

आम्ही जगतो बेफाम..!

गेल्या दीड-दोन दशकात स्मार्टफोनचा सुळसुळाट झाल्यानंतर जगभरातल्या मनुष्यमात्रांच्या हातात कॅमेऱ्याचे खेळणे आले. तोवर कॅमेऱ्यातून फोटो काढणे ही एक विशेष कला मानली जायची. आजही उत्कृष्ट छायाचित्र काढायचे असेल तर चांगला कॅमेरा हाताशी लागतोच. भिंगातून पाहात, छायाप्रकाशाचा परिणाम टिपत अचूक अंदाजात काढलेले छायाचित्र स्तिमित करते.

एक छायाचित्र हजार शब्दांचा परिणाम करुन जाते, असेही म्हटले जात असे. पण तशी प्रभावी छायाचित्रकला जोपासण्यासाठी कल्पकता आणि प्रतिभा दोन्हींचा कस लागतो. कॅमेरा हा जगाकडे बघण्याचे अनोखे भिंग होते व आहे. मोबाइल फोनमधल्या कॅमेऱ्याने मात्र हे जग अक्षरशः उलटे केले. कॅमेऱ्याचे भिंग दुनियेकडे रोखण्याऐवजी स्वतःकडे रोखले गेले, आणि 'मी दुनियेला नाही, तर दुनियेने मजला पहावे' हे उच्चरवात सांगितले जाऊ लागले. या छायाचित्राला 'सेल्फी' म्हणायचे. २००२मध्ये ऑस्ट्रेलियातील एका महाभागाने मद्यधुंद अवस्थेत जिन्यावरुन कोलमडताना स्वतःलाच टिपले, आणि त्या दुर्घटनेतूनच पहिल्या 'सेल्फी'चा जन्म झाला, अशी एक डिजिटल आख्यायिका सांगितली जाते. पुढे फ्लिकर नामे एका संकेतस्थळाने

'सेल्फी' या विशेष संबोधनासह छायाचित्रांचा स्वतंत्र विभाग सुरु केला. तेव्हापासून हे सेल्फीचे वेड वाऱ्याच्या वेगाने पसरले. आजकाल तर 'सेल्फी'च्या पुढली, 'रील्स'ची पायरी गाठली गेली आहे. 'सेल्फी' हे तर क्षणचित्र झाले, 'रील', म्हणजे लघुचित्रफित म्हणजे आपणच नायक किंवा नायिका असलेला लघुचित्रपटच. मुंबईतील एक सुशिक्षित तरुणी याच रीलच्या नादात कड्यावरुन कोसळून प्राणास मुकली. सेल्फी आणि रीलचे हे वेड आता आत्मघाताच्या थराला जाऊ लागले आहे, याची पुन्हा एकवार दाहक जाणीव करुन देणारी ही दुर्घटना.

मुंबईत राहणारी सुखवस्तू घरातली, चार्टर्ड अकाऊंटंट असलेली अन्वी कामदार ही मुलगी रील बनवण्याच्या नादात धबधब्यानजीक कड्यावरुन तीनशे फूट दरीत कोसळली. हे रील तिने बनवले नसते, तर जगाचे काहीच नुकसान होणार नव्हते. कुठलीही नेत्रदीपक कामगिरी तिच्या नावावर नोंदवली जाणार नव्हती. तिचे 'लाइक्स' मात्र नक्की वाढले असते. 'फॉलोअर्स'ची संख्या वाढली असती. तरुणांच्या भाषेत सांगायचे तर ती 'ट्रॅव्हल इन्फ्लुअन्सर' होती. आजकाल ओपिनियन मेकर्स, इन्फ्ल्युअन्सर्स, स्वयंघोषित खवय्यांचे समाजमाध्यमांवर बारमाही पीक असते. त्या डिजिटल जगात त्यांचा त्यांच्या वर्तुळात दबदबा, लोकप्रियता वगैरे असते. काही तर सोशल मीडिया स्टार असतात. जे कालपर्यंत फक्त फिल्मी सिताऱ्यांपुरतेच मर्यादित होते, ते वलयांकित आयुष्य या सोशलसिताऱ्यांनाही अनुभवता आले. भरपूर फॉलोअर्स असलेल्या एखाद्या सोशल सिताऱ्याला मॉल किंवा 'इव्हेंट' मध्ये चाहत्यांचे गराडे पडू लागले. नाही म्हणायला वाढत्या लोकप्रियतेसोबत पैकाही मिळवण्याची संधी हाती आली. वास्तवातले नीतिनियम लांबवर फेकून देऊन 'माझ्याकडे या' असे आवाहन करणारे हे विश्वामित्री आभासी जगच नवे वास्तव बनू लागले. त्या विश्वातल्या वलयासाठी अन्वी कामदारने आपले मर्त्यलोकातले जीवन मात्र अकारण संपवले. काही दिवसांपूर्वी बीडच्या एका तरुणाने भरधाव मोटारसायकल चालवत रील बनवण्याच्या खटाटोपात जीव गमावला होता. त्याही आधी संभाजीनगरातील एक युवती रिव्हर्समध्ये मोटार चालवत रील चित्रित करता करता खाईत पडली होती. सेल्फीच्या नादात दगावणाऱ्यांची जगभरातली संख्या मोजली तर ती काही लाखांच्या घरात जाईल. अक्षरशः हजारो जणांचे प्राण या बिनबुद्धीच्या, आणि बिनमहत्त्वाच्या खटाटोपामुळे आपण गमावले आहेत.

भारतात पाण्याशी खेळताना सेल्फी आणि रील चित्रित करताना कित्येकांनी मरण कवटाळले. माणूस स्वतःमध्ये गुंतला की बाकीचे जग 'आऊट ऑफ फोकस' होते. वास्तवातील जगात भौतिकशास्त्राचे, गतीचे नियम पाळावे लागतात. निसर्गाशी जपून वागायचे असते. ज्या आभासी जगासाठी अन्वीसारख्या युवती रील बनवतात, त्या दुनियेत हे कुठलेच नियम नसतात. समाजमाध्यमांवरले आपले आभासी अस्तित्व वास्तवातील जगण्यापेक्षाही अधिक आकर्षक का वाटत असेल, हा नवा प्रश्न उपस्थित झाला आहे. सोशल मीडियाचा जन्मच मुळी उन्मुक्त अभिव्यक्तीला प्रतिसाद देण्याने झाला.

वनस्पतींच्या विविधतेवर परिणाम

हवामानबदल, तापमानवाढ असे शब्द ऐकले की त्याचा संबंध आपण तीव्र उन्हाळा, अवकाळी पाऊस, पीक उत्पादनावर परिणाम, त्यांचे अर्थव्यवस्थेवर पडसाद यांच्याशी जोडतो. पण हे झाले थेट आणि दृश्य परिणाम. या व्यतिरिक्त झपाट्याने बदलणाऱ्या हवामानाचा नैसर्गिक परिसंस्थांवर मोठा आघात होत असतो. या लेखमालेतून नैसर्गिक परिसंस्थांवर होणाऱ्या परिणामांचा आपण आढावा घेणार आहोत. हवामानबदल पृथ्वीला नवीन नाही. साडेचार अब्ज वर्षांच्या इतिहासात अनेक वेळा हवामानात मोठे बदल झाले आहेत. मग आज त्याची चर्चा का होत आहे? आज होत असलेले बदल गेल्या तीनशे वर्षांचे आहेत, तर पृथ्वीच्या इतिहासात झालेले बदल काही कोटी वर्षांच्या कालावधीत होऊन गेले आहेत. एवढ्या मोठ्या कालावधीत सजीवांना या बदलाशी अनुकूलन करून घेण्याची संधी असते. ज्या प्रजातींना हे जमत नाही, त्या लुप्त होतात. माणूस यात अपवाद म्हणता येईल, कारण सरासरी तापमान १.५ अंश सेल्सियसने वाढले असले तरी तंत्रज्ञानाच्या आधाराने आपल्या प्रजातीला बदलत्या वातावरणात तग धरता येतो. गेल्या दशकात हवामान बदलामुळे नैसर्गिक आपत्तीची वारंवारता आणि तीव्रता वाढत चाललेली आहे. चक्रीवादळ, ढगफुटी, भूस्खलन, कोरडे दुष्काळ अशा अनेक आपत्ती देशभर आणि जगाच्या कानाकोपऱ्यांत हजेरी लावत आहेत. यांचा आघात अर्थव्यवस्थेवर तर होतोच होतो, पण निसर्गावर सुद्धा होतो आहे. नैसर्गिक परिसंस्थांमध्ये दोन प्रकारचे घटक असतात - अचेतन किंवा भौतिक घटक आणि सजीव घटक. या दोन्हीत ऊर्जा आणि द्रव्यांची सतत देवाण-घेवाण चालू असते. या विनिमयातून सजीवसृष्टीला पर्यावरणीय सेवा उपलब्ध होतात. वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण राखणे, भूरुपात कार्बन शोषून

ठेवणे, जलचक्राची निर्मिती, भूजल पुनर्भरणा, रोगराईवर नियंत्रण, पूरनियंत्रण, मृदानिर्मिती, परागीभवन, बिया रुजवणे अशा अनेक सेवा सशक्त परिसंस्थेतून सतत मिळत असतात. यातूनच शेतमालाचे उत्पादन होते, समुद्रातून गोडे पाणी मिळते, हवेत प्राणवायूचे प्रमाण स्थिर राहते. या सेवांमुळे पृथ्वीला सजीवसृष्टी पोसण्याची क्षमता प्राप्त होते, आणि मानवी अर्थव्यवस्था शक्य होते. हवामानबदलाचा तात्काळ परिणाम पर्यावरणीय सेवांच्या घट होण्यामध्ये दिसून येतो. पण या व्यतिरिक्त पर्यावरणावर अनेक प्रहार होत असतात.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई.
दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७२५३४ e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in

निविदा सुचना क्र. ३ सन २०२४-२०२५
ई-निविदा सूचना

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून (कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकरावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अनु.क्र	कामाचे नाव	अंदाजित किंमत
१.	राजभवन, मुंबई येथील अस्तित्वातील समुद्र धुप प्रतिबंधक बंधा-याचे मजबूतीकरण करणे.	रु. २,३३,२०,०१०/-

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.१८/०७/२०२४ स. ११.३० ते २५/०७/२०२४ दु.१४.०० पर्यंत

निविदा पुर्व बैठक- :- दि २२/०७/२०२४ दु.२.०० वा. मा.किनारी अभियंता, सा.बां मंडळ, बांद्रा ३ ला मजला, प्रशासकीय इमारत, बांद्रा, मुंबई-५१ येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.२६/०७/२०२४ दु.१५.०५ वा.

टिप- ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

(बी.बी.नेनवरे)
पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई

जा.क्र. पअउ/निविदा/९३५
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन,नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक - ११/७/२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/९३६

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

विकासकाला बिनव्याजी ४०० कोटी; राज्य सरकारची मंजुरी

■ मुंबई : सम्यक कासारे

राज्यात आतापर्यंत एकही गृहप्रकल्प न राबविलेल्या खासगी विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली शासनाने बिनव्याजी ४०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. महाराष्ट्र निवारा निधीतून ही रक्कम उपलब्ध करून देण्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे.

ही रक्कम एकरकमी न देता कामातील प्रगती पाहून सुरुवातीला ५० कोटी व नंतर टप्प्याटप्प्याने इतर रक्कम वितरित करण्याचा तोडगा म्हाडाने सुचविला आहे. मात्र याबाबत अंतिम निर्णय मुख्यमंत्री कार्यालयाकडून घेतला जाणार आहे.सोलापूर येथील रे नगर या पंतप्रधान आवास योजनेतील ३० हजार घरांसाठी महासंघाला २७० कोटी रुपये विशेष बाब म्हणून याआधी उपलब्ध करून देण्यात आले होते. आतापर्यंत खासगी विकासकाला असा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. वांगणीजवळ शीळ आणि काराव येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत कोकण गृहनिर्माण मंडळामार्फत प्रकल्प राबविणाऱ्या मे. चड्ढा डेव्हलपर्स आणि प्रमोटर या दिल्लीस्थित कंपनीवर ही मेहेरनजर दाखविण्यात आली आहे. देशभरात एकही गृहप्रकल्प नावावर नसलेल्या या कंपनीला झुकते माप दिले गेल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. २०२१ मध्ये या विकासकाशी म्हाडाने करार केला. मात्र आतापर्यंत एकाही घराचा ताबा लाभार्थींना दिलेला नाही.

आर्थिक दुर्बल घटकांसाठी २६ हजार २०० घरांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या ३५ व्या बैठकीत अंशत: मान्यता मिळाली असून यापैकी ८२२८ घरांचे बांधकाम सुरू असल्याचा दावा करीत या कंपनीने पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्प डिसेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या फक्त २५ टक्के म्हणजे ४०० कोटी रुपये बीज भांडवल राज्य शासनाने उपलब्ध करून द्यावे, असे पत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिसेंबर २०२३ मध्ये दिले. मुख्यमंत्र्यांनीही शेरा मारून

गृहनिर्माण विभागाला तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. गृहनिर्माण विभागाने असा निधी देण्यास विरोध दर्शविला. त्यानंतरही हा निधी वितरित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. याबाबतच्या आदेशाची प्रत 'लोकसत्ता'कडे आहे.

मे. चड्ढा डेव्हलपर्स आणि प्रमोटरचा हा खासगी प्रकल्प असून या प्रकल्पाला बीज भांडवल म्हणून निधी उपलब्ध करून देणे योग्य होणार नाही, असे याबाबतच्या प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत मुख्यमंत्र्यांनी ४०० कोटी रुपये देण्यास मान्यता दिली. याबाबत मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्रतिसाद मिळाला नाही. अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल यांनी आपल्याला याबाबत कल्पना नाही, असे सांगितले. गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर सिंग यांनीही प्रतिसाद दिला नाही. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी, असे काहीही नाही, असे सांगत अधिक बोलण्यास नकार दिला. मुख्यमंत्र्यांनी ४०० कोटींचा निधी देण्याचे आदेश दिल्यानंतर ही रक्कम एकरकमी न देता टप्प्याटप्प्याने म्हणजे प्रतिटप्पा ५० कोटी अशी वितरित करण्याचा तोडगा म्हाडाने गृहनिर्माण विभागाला दिला आहे.

सदर रक्कम प्रकल्पावर खर्च केल्याबाबत सनदी लेखापालांचे प्रमाणपत्र दिल्यानंतर पुढील टप्प्यातील निधीचे वाटप करावे, असेही सुचविले आहे. पंतप्रधान आवास योजनेची मुदत ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत असल्यामुळे कामाच्या प्रगतीनुसारच निधी वितरित करावा, असेही म्हाडाने आपल्या अहवालात म्हटले आहे.

दाऊद दहशतवादी घोषित म्हणून त्याच्याशी संबंधितांवर युएपीए अंतर्गत कारवाई नको – उच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी

■ मुंबई : नितीन देवळेकर

कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याला बेकायदा कारवाया प्रतिबंध कायद्यांतर्गत (युएपीए) व्यक्तिश: दशहतवादी घोषित करण्यात आले आहे. असे असले तरी त्याच्याशी किंवा त्याच्या टोळीशी संबंधित व्यक्तीला युएपीएअंतर्गत कारवाई केली जाऊ शकत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले. दोघांना जामीन मंजूर करताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवले. केंद्र सरकारने ४ सप्टेंबर २०१९ रोजी दाऊदला युएपीएअंतर्गत दहशतवादी घोषित केले. परंतु, युएपीए कायद्याचा विचार करता एखाद्या व्यक्तीशी संबंधित आणि दशतवादी संघटनेशी संबंधित तरतुदी वेगवेगळ्या आहेत. या प्रकरणात याचिकाकर्ते हे दाऊदच्या टोळीचे सदस्य असल्याचा उल्लेख आहे. दाऊदला युएपीए कायद्याअंतर्गत व्यक्तिश: दशहतवादी घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे, एखादी दाऊदच्या टोळीशी संबंधित आहे म्हणून तिच्यावरही युएपीएअतंर्गत कारवाई केली जाऊ शकत नाही, असे निरीक्षण न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने नोंदवले. त्याचप्रमाणे,

दोन्ही याचिकाकर्त्यांना जामीन मंजूर केला. आरोपपत्रात दहशतवादी कृत्य करणे किंवा खंडणीसारखे आरोप सिद्ध करणारे कोणतेही पुरावे जोडण्यात आलेले नाही. शिवाय, आरोपींकडून जप्त केलेला अमली पदार्थाचा साठाही अल्प प्रमाणात असल्याचे निरीक्षण न्यायालयाने दोन्ही आरोपींना जामीन मंजूर करताना स्पष्ट केले.

राज्याच्या दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) ऑगस्ट २०२२ मध्ये फैज भिवंडीवाला याच्याकडून ६०० ग्रॅम गांजा जप्त केला होता. तसेच, त्याला अटक केली होती. याशिवाय, त्याचा साथीदार परवेज वैद हा दाऊद टोळीचा कथित सदस्य असल्याच्या संशयावरून त्यालाही अटक केली होती. या दोघांवरही युएपीएतंर्गत दहशतवादी संघटनेचे सदस्य असणे, दहशतवादी कृत्ये करणे आणि गुन्हा करण्यासाठी पैसे गोळा करणे, तसेच अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यातील (एनडीपीएस) तरतुदीअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. फैज आणि परवेज या दोघांनीही उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता.

जागा काढून घेतल्याने अश्व शर्यतींच्या शुल्कात कपात

■ मुंबई : सम्यक कासारे

महालक्ष्मी रेसकोर्सवर उभारण्यात येणाऱ्या जागतिक दर्जाच्या 'सेंट्रल पार्क'साठी राज्य शासनाने २११ एकर पैकी १२० एकर जमीन 'रॉयल वेस्टर्न क्लब'कडून काढून घेतल्याने मुंबई, पुण्यातील अश्व शर्यतीसाठी केवळ एक कोटी परवाना शुल्क आकारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. ब्रिटिश काळापासून

क्लबच्या ताब्यात असलेल्या या जागेवरील श्रीमंतांचा खेळ असलेल्या अश्व शर्यत परवानामधून दरवर्षी काही कोटी सरकारी तिजोरीत जमा होतात.

मुंबईतील महालक्ष्मी व पुण्यातील पुणे रेस कोर्स मैदानावर वर्षातून ७० दिवस अश्व शर्यतीचे आयोजन केले जाते. यातील १५ दिवस सेवाभावी संस्थांच्या आर्थिक मदतीसाठी अश्व शर्यत आयोजित करणे बंधनकारक आहे. ब्रिटिश काळापासून सुरू असलेला 'दी महाराष्ट्र रेसकोर्स लायसन्स' कायदा १९१२ मधील कलम ४ (२) नुसार या अश्व शर्यतींसाठी परवाना शुल्क आकारले जाते. सध्या या अश्व शर्यतींचे आयोजन करण्याचा परवाना 'रॉयल वेस्टर्न क्लब लिमिटेड' यांच्या नावे आहे. या शुल्क आकारणीसाठी गेली अनेक वर्ष विशिष्ट सूत्र आकारण्यात आलेले नाही.

२०११-१२ मध्ये तीन कोटी ३० लाख परवाना शुल्क आकारण्यात आले होते. पुढील दोन वर्ष हे शुल्क कायम ठेवण्यात आले. त्यानंतर २०१४-१५ मध्ये हे शुल्क तीन कोटी ९९ लाख ३० हजार होते. या शुल्कात दहा, वीस टक्के वाढ करून हे शुल्क २०२०-२१ मध्ये ७ कोटी ७ लाख ३८ हजार रुपये आकारण्यात आले आहे. करोना काळात ११ महिने अश्व शर्यती आयोजित करता आल्या नाहीत. या काळातील ६ कोटी ५९ लाख १४ हजार ९५१ रुपये माफ करण्यात आले.

एमएमआरडीएला ३००० पैकी केवळ २५०० कोटीच देणार, महापालिका प्रशासनाचा निर्णय

■ मुंबई : विशाल कारंडे

मेट्रोचे जाळे मुंबईत निर्माण करण्यात येत असल्यामुळे या खर्चाचा काही भाग म्हणून एमएमआरडीएने मुंबई महापालिकेकेड तीन हजार कोटींची मागणी केली होती. मात्र त्यापैकी आधीच दोन हजार कोटी देण्यात आले असल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. उर्वरित एक हजार कोटींपैकी केवळ पाचशे कोटी देण्यात येतील, अशी भूमिका पालिका प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे या दोन प्राधिकरणांमधील निधीचा वाद आता विकोपाला जाण्याची चिन्हे आहेत. मुंबईत एमएमआरडीए मेट्रोचे जाळे उभारत आहे. या पायाभूत सुविधेच्या खर्चापैकी २५ टक्के हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थांवर राज्य सरकारने टाकला आहे. त्यानुसार मुंबई महानगरपालिकेकडे तीन हजार कोटींची मागणी एमएमआरडीएने केली आहे. मात्र पालिकेने हा निधी अद्याप न दिल्यामुळे नगरविकास

विभागाने मुंबई महानगरपालिकेकडे निधी देण्याची मागणी केली असल्याचे समजते. त्यामुळे पालिका आणि एमएमआरडीए या दोन प्राधिकरणांमधील निधीबाबतचा वाद निर्माण झाला आहे. निधीअभावी मेट्रो खर्चातील काही वाटा देणे तूर्तास शक्य नाही, अशी भूमिका मुंबई महानगरपालिकेने घेतली होती. मात्र आता पालिका प्रशासनाने पाचशे कोटी देण्याची तयारी दर्शवली आहे. याबाबत पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सांगितले की, एमएमआरडीएला मुंबई महानगरपालिकेने फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात दोन हजार कोटी दिले आहेत. त्यामुळे एमएमआरडीएला तीन हजार कोटींपैकी सध्या केवळ एक हजार कोटीच देणे आहे. त्यापैकी पाचशे कोटी देण्यात येतील. राज्य सरकार निर्देश देईल तेव्हा हा निधी दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले. मेट्रो प्रकल्प जेव्हा सुरू झाला तेव्हा म्हणजेच सुमारे २०१५ -१६ मध्ये राज्य सरकारने बांधकामातून मिळणाऱ्या अधिमूल्याची रक्कम दुप्पट केली.

भाजपच्या बैठकीत मित्रपक्षांविषयी नाराजी; शिवसेना, राष्ट्रवादीने लोकसभेत काम न केल्याच्या तक्रारी

■ मुंबई : राकेश गायकवाड

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) पक्षांतील काही नेत्यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवारासाठी काम केले नाही किंवा महाविकास आघाडीसाठी काम केले, अशा तक्रारींचा पाढा भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडे मांडण्यात आल्याचे सांगितले जात आहे. लोकसभेचे जागावाटप आणि उमेदवारांची घोषणा उशिरा झाल्याने प्रचारास अवधी मिळाला नसल्याने आता विधानसभेसाठी जागावाटप आणि उमेदवारनिश्चिती लवकर व्हावी, अशी मागणीही प्रदेशातील नेत्यांनी वरिष्ठांकडे केली. भाजपचे महाराष्ट्रासाठीचे प्रभारी भूपेंद्र यादव, सहप्रभारी अश्विनी वैष्णव, सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजप अध्यक्ष आशीष शेलार यांच्यासह प्रदेश विस्तारित समितीतील नेत्यांची गुरुवार-शुक्रवारी बैठक झाली. यात मतदारसंघनिहाय

आढावा घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेली मते, अडचणी व वाद, आमदार, पदाधिकारी व नेत्यांच्या भूमिका आणि त्यांनी काम केले किंवा नाही, राजकीय परिस्थिती, जिंकून येऊ शकेल असे संभाव्य उमेदवार आदी मुद्द्यांवर दोन दिवस चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

भाजपच्या प्रदेश नेत्यांनी शिंदे व पवार गटातील नेत्यांनी योग्य प्रकारे काम न केल्याच्या आणि विरोधात काम केल्याच्याही तक्रारी केंद्रीय नेत्यांकडे केल्याचे समजते. मात्र बावनकुळे यांनी याचा इन्कार केला. बैठकीत विधानसभा मतदारसंघनिहाय राजकीय परिस्थिती व अन्य मुद्द्यांवर चर्चा झाली. राज्यातील प्रत्येक निवडणूक केंद्रापर्यंत पक्षाची प्रचार यंत्रणा, केंद्र व राज्य सरकारचे निर्णय, राज्य सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या योजना व निर्णयांचा प्रचार, त्यांचे लाभ व माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठीचे नियोजन आदी बाबींवर आणि पुणे येथे रविवारी होणाऱ्या अधिवेशनाच्या तयारीसाठी चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

म्हाडाकडून गोरेगावमध्ये आणखी अडीच हजार घरे

■ मुंबई : नितीन देवळेकर

गोरेगाव, पहाडी येथे २,५०० हून अधिक घरांची निर्मिती केल्यानंतर आता म्हाडाच्या मुंबई मंडळ गोरेगावमध्ये नवीन गृहप्रकल्प हाती घेणार आहे. गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) पुनर्विकासाअंतर्गत उपलब्ध झालेल्या भूखंडांवर २,५०० घरे बांधण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटासाठी ही घरे असणार आहेत. या घरांची निर्मिती दोन टप्प्यांत करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यातील १,५०० घरांच्या कामासाठी निविदा काढण्याची तयारी मुंबई मंडळाने सुरू केली आहे. पत्राचाळ म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासातून मुंबई मंडळाला आपल्या हिश्श्यातील २,७०० घरे सोडतीसाठी विकासकाकडून उपलब्ध होणार होती. मात्र विकासकाने पुनर्विकास अर्धवट सोडल्याने प्रकल्प रखडला. तर दुसरीकडे प्रकल्पात आर्थिक गैरव्यवहार केला. प्रकल्प वादात अडकला आणि शेवटी राज्य

सरकारने विकासकाकडून प्रकल्प काढून घेत व म्हाडाकडे सोपवला.

दरम्यान, विकासकाने म्हाडाच्या हिश्श्यातील ३०६ घरांचे काम सुरू केले, मात्र ते अर्धवट सोडले. या अर्धवट घरांसाठीच मंडळाने २०१६ मध्ये सोडत काढली होती. एकूणच प्रकल्प ताब्यात आल्यानंतर मुंबई मंडळाने मूळ रहिवाशांच्या ६७२ घरांसह सोडतीतील घरे पूर्ण करण्याचे काम २०२२ मध्ये हाती घेतले. आता हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. असे असताना आता मंडळाने आपल्या हिश्श्यातील २,५०० घरांची बांधणी करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी दिली. पहिल्या टप्प्यातील एक हजार ५०० घरांच्या बांधकामासाठी निविदा काढण्याची तयारी सुरू आहे. येत्या काही दिवसांतच निविदा प्रसिद्ध केली जाईल, असेही जयस्वाल यांनी सांगितले.

गुटखा कारवाईत 'एफडीए' ला व्यवस्थेचाच अडथळा! गुटखा विक्रीवर निर्दयपणे कारवाईची गरज...

■ मुंबई : गणेश नागडे

कांदिवलीतील एका दुकानात मोठ्या प्रमाणात गुटखा व पान मसाला असल्याची माहिती मिळाल्याने अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी धाड टाकण्यासाठी पोहोचले. मात्र काही वेळातच स्थानिक गुंड तसेच तथाकथित राजकीय कार्यकर्त्यांनी या अधिकाऱ्यांना घेरुन बाचाबाची सुरु केली. प्रकरण हातघाईवर येण्याचे चित्र निर्माण झाले आणि एफडीएच्या अधिकाऱ्यांना कारवाई न करता परतावे लागलेष्ठ अशा घटनांचा सामना गेल्या वर्षभरात एफडीएच्या अधिकाऱ्यांना अनेकदा करावा लागला आहे. तरीही गुटखा विरोधी मोहीम तीव्र करण्याचा निर्धार एफडीएचे आयुक्त अभिमन्यू काळे यांनी व्यक्त केला आहे.

तरुण पिढीच्या आरोग्यासाठी घातक असलेल्या गुटखा विक्रीवर राज्यात २०१२पासून बंदी घालण्यात आली आहे. मात्र आजही शाळा कॉलेजच्या परिसरातील अनेक पानटपऱ्यांवर गुटखा व पान मसाला सहज मिळताना दिसतो. पोलीस व अन्न आणि औषध प्रशासनाला या बेकायदा गुटख्यावर कारवाई करण्याचे अधिकार असले तरी या दोन्ही यंत्रणांमध्ये सुसंवाद अभावानेच आढळून येतो. काही प्रकरणात एफडीए च्या अधिकाऱ्यांनी स्थानिक पोलिसांकडे सहकार्य मागितले असता त्यांना पोलीस ठाण्यात बसवून चहापान करवले व नंतर पोलीस घेऊन ते कारवाईसाठी संबंधित दुकानात गेले असता काहीही हाती लागले नाही. याचा अर्थ कोणीतरी कारवाईची माहिती आधिच दिली असणार असे एफडीएच्या सूत्रांचे म्हणणे आहे. बहुतेकवेळा एफडीएचे अधिकारी कारवाईसाठी जातात तेव्हा स्थानिक गुंड तसेच राजकीय कार्यकर्ते वा नेते येऊन अडथळा आणतात. परिणामी अनेकदा प्रभावी कारवाई करता येत नाही असेही सूत्रांचे म्हणणे आहे.

यातील खरी गोम म्हणजे एफडीएकडे आजघडीला

FDA MAHARASHTRA

कारवाईसाठी पुरेसे अधिकारी व कर्मचारी नाहीत. अन्न निरीक्षकांची शेकडो पदे रिक्त आहेत. तसेच कारवाई केल्यानंतर जी कायदेशीर प्रक्रिया करणे आवश्यक असते त्यासाठी लिपिक नाहीत तसेच टंकलेखही नाहीत. परिणामी पुरेशा सुरक्षेशिवाय स्वत: च्या जीवावर उदार होऊन कारवाई करायची आणि नंतर कायदेशीर बाबींची पूर्तता करत बसायचे. यातूनच अधिकारीही कारवाईबाबत उदासिनता बाळगून असतात.

या पार्श्वभूमीवर अन्न व औषध विभागाचे आयुक्त अभिमन्यू काळे यांनी मोठ्या प्रमाणात अन्न व औषध निरीक्षक तसेच कर्मचारी भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. तसेच कोणत्याही परिस्थितीत गुटख्यावरील कारवाई आम्ही थांबू देणार नाही, असे अभिमन्यू काळे यांनी सांगितले. १ एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या काळात गुटखा कारवाईसाठी एकूण १४९४ ठिकाणी तपासणी करण्यात आली असून यात ८५१ जणांवर अफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तर ३० कोटी २४ लाख ९४८ रुपयांचा गुटखा वा तत्सम पदार्थ जप्त करण्यात आल्याचे एफडीएच्या सूत्रांनी सांगितले. १ एप्रिल २४ ते १४ जून २४ पर्यंत एकूण २१८ ठिकाणी कारवाई करण्यात आली असून १२७ लोकांना अटक करण्यात आली. याशिवाय १०५ दुकांनाना टाळे ठोकण्यात आल्याचेही सूत्रांनी सांगितले.

देशात दरवर्षी कर्करोगाने ५२ हजार लोकांचा मृत्यू होतो तर दरवर्षी ७७ हजार लोकांना तोंडाचा कर्करोग होत असून यातील बहुतेकजण तंबाखू वा गुटखा सेवन करणारे आहेत. प्रामुख्याने तरुणांमध्ये गुटखा वा तत्सम पदार्थ खाण्याची सवय मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याने शाळा कॉलेजच्या परिसरात गुटखा विक्री करणाऱ्या पानटपऱ्यांवर निर्दयपणे कारवाई करण्याची गरज असल्याचे अभिमन्यू काळे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन
संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
Email :- dirmum.pg@mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र:- ०२२-२२०१६८५२
ई-निविदा सुचना क्र.०४ सन २०२४-२०२५

संचालक, उपवने व उद्याने,मुंबई यांचे कार्यालय, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई -४००००१, दुरध्वनी क्रमांक:- ०२२-२२०१६८५२ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, फोर्ट, मुंबई यांनी राखून ठेवला आहे अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत रक्कम रुपये
१.	मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, सचिव व अधिकारी तसेच मंत्रालय व नविन प्रशासकीय इमारत व मा. मंत्री महोदय यांचे निवासस्थान येथे शोभिवंत झाडांच्या कुंडयांची ने आण करणे व मंत्रालय रोपवाटीकेमध्ये दैनंदिनकामासाठी मजूर यांचा पुरवठा करणे. (११ महिन्यांकरीता)	रु. १७,५८,९००/-
२	मध्यवर्ती रोपवाटीका पुणे, येथे (३ शिफ्टमध्ये) आणि पुणे विद्यापीठ पार्क (२ शिफ्ट), खाजगी सुरक्षा रक्षक पुरवणे. (११ महिन्यांकरीता)	रु. १२,६८,४३८/-
३	पुणे, येथे जिल्हाधिकारी कार्यालय, व्ही. व्ही. आय. पी. आणि नविन सर्कीट हाऊस आवारातील उद्यानाची देखभाल करणे. (१२ महिन्यांकरीता)	रु. २६,७६,७६८/-

(एकूण ३ कामे)

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.१६/०७/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दि.२३/०७/२०२४ रोजी १८.००

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दि.२५/०७/२०२४ रोजी १५.३० वाजता

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

mahatenders.gov.in

जा.क्र./संउवउमुं/ले.शा./ई-नि.प्र./२४-२५/९१२०

संचालक यांचे कार्यालय,
उपवने व उद्याने, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मर्झबान रोड,
फोर्ट,मुंबई :- ४०० ००१
दुरध्वनी क्र :- ०२२-२२०१६८५२
Email-dirmum.pg@mahapwd.com
दि-नांक :- १०/७/२४

संचालक
उपवने व उद्याने
महाराष्ट्र राज्यमुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/९४१

माजी नगरसेविकांचे वायरल चित्रफित प्रकरण: आमदार गीता जैन समर्थकांविरोधात गुन्हा दाखल

■ **वसई : सुचिता देशमुख**

मिरा भाईंदर शहरातील भाजपच्या माजी नगरसेविकांच्या वायरल चित्रफिती प्रकरणी आमदार गीता जैन यांच्या समर्थकांविरोधात हा गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे नरेंद्र मेहता आणि गीता जैन यांच्या राजकीय वाद अधिकच चिघळला आहे. माझ्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून मला या प्रकरणात गोवण्यात येत असल्याचा आरोप आमदार जैन यांनी केला आहे. भाईंदरचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी १५ आणि १६ जुलै रोजी गोव्यात पक्षाची बैठक आणि सहलीचे आयोजन केले होते. त्यामध्ये भाजपाच्या माजी नगरसेविकांसह ५८ जण सहभागी झाले होते. गोव्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये हे सर्व जण सहलीसाठी आले होते. हॉटेलात माजी महिला नगसेविका नृत्य करत असतानाची चित्रफित समाजमाध्यमांवर वायरल करण्यात आली. 'आषाढी एकादशीला वारकरीची भक्ती आणि माजी आमदार नरेंद्र मेहता यांची गोवा वारी' असा आक्षेपार्ह मजकूर या चित्रफितीमध्ये टाकण्यात आला होता. ही खासगी चित्रफित वायरल करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी शुक्रवारी संध्याकाळी भाजपाच्या महिला कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यात

गोंधळ घातला होता. कायदेशीर कारवाई करण्यासाठी शुक्रवारी या माजी नगरसेविका आणि भाजप महिला आघाडीच्या नेत्यांनी नवघर पोलिस ठाण्याला घेराव घातला होता. त्यामुळे पोलिसांनी दिपक ठाकूर आणि सोनू यादव यांच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (२) ७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक संदीप व्हसकोटी या प्रकरणाचा तपास करत आहेत. माजी नगरसेविका रुपाली शिंदे-मोदी (५०) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी अनुसूचित जातीची (एससी) असल्याने हेतुपुरस्सर माझी बदनामी करण्यासाठी ही चित्रफित विविध समाजमाध्यमावर प्रसारित करण्यात आल्याची तक्रार त्यांनी दिली होती. त्यामुळे तक्रार दाखल करण्यासाठी जातीचा आधार घेतल्याचा आरोप करण्यात येत आहे. याप्रकरणी आमदार गीता जैन यांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाल्याने त्या आक्रमक झाल्या आहेत. शनिवारी जैन यांनी पत्रकार परिषद घेऊन हल्ला बोल केला. माझ्या समर्थकांवर गुन्हे दाखल करून या चित्रफित प्रकरणात मुद्दाम मला खेचण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या चित्रफितीमध्ये आक्षेपार्ह काहीच नव्हते. उलट ज्या व्यक्तीने चित्रफित काढून आमच्या कार्यकर्त्यांकडे पाठवली त्याला आरोपी करणे गरजेचे होते. मात्र काही महिलांनी पोलिसांवर दबाव टाकून हा गुन्हा दाखल केला असल्याचा आरोप जैन यांनी केला. या चित्रफितीमुळे मेहता आणि जैन यांच्या राजकीय वाद वाढला आहे.

भाईंदरच्या उत्तन येथील घटना, खड्ड्यात बुडून ६ वर्षीय मुलाचा मृत्यू

■ **भाईंदर : सतिश सोनावणे**

उत्तनच्या येडू कंपाउंड परिसरात सहा वर्षीय मुलाचा पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबत उत्तन पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. किरण हर्षद कॉलर(६) असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. काशिमीरा येथे राहणारा किरण काही दिवसापूर्वीच आपल्या आईसोबत तो उत्तन येथील येडू कंपाउंड येथे आपल्या आजीकडे राहायला आला होता. बुधवारी सकाळी खेळायला बाहेर गेलला किरण बराच वेळ दिसत नसल्यामुळे त्याची आई शोध घेत होती.यावेळी घराजवळील एका डबक्याच्या शेजारी त्याची चप्पल पडल्याचे दिसून आले.त्यामुळे तो पाण्यात बुडाल्याचा संशय झाल्याने कुटुंबीयांनी याबाबतची माहिती महापालिकेच्या अग्निशमन विभागाला दिली. त्यानुसार अग्निशमन विभागाने डबक्यात शोध मोहीम राबवली असता त्यात मुलाचा मृतदेह आढळून आला.त्यानंतर याबाबतची माहिती उत्तन पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी भाईंदरच्या जोशी रुग्णालयात पाठवला असल्याची माहिती उत्तन पोलीस

ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम कारंडे यांनी दिली आहे. मिरा भाईंदर महापालिका हद्दीत पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून महिन्याभरात दोन बालकांचा मृत्यू झाल्याच्या समोर आले. यापूर्वी २२ जुन रोजी पेणकर पाडा भागातील नागरी वस्तीत असलेल्या खड्ड्यात बुडून श्रीयांश मोनू सोनी(५) या मुलाच्या मृत्यूची घटना ताजी असतानाच आता ही घटना घडली आहे.

बेकायदेशीर विक्री, तरुणींच्या जीवाला धोका; वसई विरार शहरात गर्भपात गोळयांचा काळाबाजार

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

मुलींना गर्भपातासाठी बेकायदेशीररित्या गर्भपाताच्या गोळया (एमटीपी किट) काळया बाजारात विक्री केली जात असल्याचे प्रकरण समोर आले आहे. वालीव पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीवर गुन्हा दाखल केला असून गर्भपाताच्या गोळयांचा मोठा साठा जप्त केला आहे. या रॅकेट मध्ये डॉक्टर, औषध विक्रेते यांचा देखील सहभाग असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

शहरातील खासगी डॉक्टर तसेच औषध विक्रेते (मेडिकल स्टोअर्स) मध्ये बेकायदेशीररित्या गर्भपाताच्या गोळयांची (एमटीपी किट) विक्री केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या संचात (किट) मध्ये ५ गोळया असतात. या गोळयांची किंमत अवघी ६० रुपये असते. मात्र काळया बाजारात या गोळया ५ ते १० हजार रुपयांना दिल्या जात असल्याचे उघडकीस आले आहे. वालीव पोलिसांनी या प्रकरणी नालासोपाराच्या शिर्डी नगर येथे सापळा लावून अजित पांडे (४२) याला ताब्यात घेतले. औषध विक्रीचा कुठलाही परवाना त्याच्याकडे नव्हता. तरी या गोळया तो औषध विक्रेते आणि खासगी डॉक्टरांना विकत होता अशी माहिती तपासात समोर आली आहे. त्याच्याविरोधात औषध निरीक्षक किशोर रांजणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार औषध व सौंदर्य प्रसाधन कायद्याच्या विविध कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपीकडून अशा गोळयांचे ३०० संच जप्त करण्यात आले आहे. त्याची किंमत १ लाख ३० हजार एवढी आहे.

या गोळया बनविणारी कंपनी पुण्यात आहे. तेथून त्या उत्तरप्रदेशात वितिरत केल्या जात होत्या. आरोपी पांडे हा तेथून गोळया आणून विक्री करत होता, अशी माहिती वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे यांनी दिली. काही खासगी दवाखान्याती डॉक्टर्स वाटेल त्या किंमतीला गोळया विकत होते. या संचावर बारकोड असल्याने कुठे वितिरत केल्या

गेल्या, कुणी विकल्या त्याची पाळेमुळे शोधून कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती राणे यांनी दिली. शस्त्रक्रियेविना गर्भपात करण्यासाठी गर्भपाताच्या गोळया (एमटीपी किट) स्त्री रोग तज्ञांकडून दिल्या जातात. त्यासाठी आधी संबंधित महिलांची शारिरिक तपासणी केली जाते त्यानुसार या गोळयांची किती मात्रा (डोस) द्यायचा ते ठरवले जाते. डॉक्टरांच्या चिठ्ठी (प्रिस्क्रिप्शन) शिवाय या गोळयांची विक्री करणे बेकायदेशीर आहे. अशा गोळया डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतल्या तर जीवावर बेतू शकते, असे पालिक्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ भक्ती चौधरी यांनी सांगितले. शहरातील डॉक्टर्स अशा गोळयांची विक्री करत असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असेही डॉ चौधरी यांनी सांगितले.

गर्भपात गोळयांची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती मिळल्यानंतर आम्ही सापळा लावून ही कारवाई केली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे – जयराज रणावरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव बदनामी होऊ नये म्हणून मुली बेकायदेशीर मार्गाने मिळालेल्या गर्भपाताच्या गोळया घेतात. परंतु हे धोकादायक आहे. मुलींनी स्त्रीरोगतज्ञांकडून तपासणी करून गोळया घ्याव्यात. डॉक्टरांकडे रुग्णांची गोपनियता राखली जाते.

विरार पोलिसांच्या धमकीमुळे आत्महत्या, १० लाखांची नुकसानभरपाई देण्याचे मानवाधिकार आयोगाचे आदेश

■ **विरार : सचिन कदम**

विरार पोलिसांनी केलेल्या दमदाटीमुळे आत्महत्या करणाऱ्या अभय पालशेतकरच्या आईला १० लाखांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश मानवाधिकार आयोगाने दिले आहेत. २१ एप्रिल रोजी अभयने आत्महत्या करण्यापूर्वी चित्रफित तयार करून पोलिसांनी धमकी दिल्याचे सांगितले होते.

विरार पुर्वेच्या मनवेलपाडा येथे अभय पालशेतकर (२८) हा पत्नी आरोही पालशेतकर (२५) हिच्यासोबत रहात होता. वर्षभरापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते. त्यांच्यात कौटुंबिक वाद होते. २१ एप्रिल रोजी त्याच्या पत्नीने अभय विरोधात पोलिसात तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिसांनी अभयला बोलावून १४९ अंतर्गत नोटीस देऊन समज दिली होती. घरी आल्यावर अभयने घरातील हॉलच्या छताला साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चित्रिफत तयार करून नातेवाईकांना पाठवली. सुनिल पवार नामक पोलिसाने टायर मध्ये घालून मारण्याची धमकी दिल्याने मी आत्महत्या करत असल्याचे या चित्रफितीत त्याने सांगितले होते. परंतु विरार पोलिसांनी फक्त अभयच्या पत्नीवरच गुन्हा दाखल केला आणि पोलिसांची फक्त विभागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. याच्या संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. पोलिसाला सोयीस्करररित्या वाचवले जात असल्याचा आरोप करण्यात येत होता. त्यामुळे माध्यमात आलेल्या बातम्यांच्या आधारे राज्याच्या मानवाधिकार आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली होती. आयोगाने पोलीस आयुक्तांना यासंदर्भात नोटीस पाठवून स्पष्टीकरण देण्याचे आदेश देण्यात आले

होते. सुनावणीनंतर आयोगाने पोलिसांच्या कृतीला दोषी ठरवले आहे. पोलिसांनी केलेली दमदाटी आणि धमकी हे मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी मयत अभयची आई उज्वला पालशेकर यांना ६ आठवड्याच्या आत १० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. जर या कालावधीत नुकसान भरपाई दिली नाही तर ८ टक्के व्याज दराने ती द्यावी लागणार असल्याचे आदेशात म्हटले आहे. एम.ए.सईद आणि के.के.तातेड यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहे. याशिवाय पोलिसांनी नागरिकांशी कसे वागावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी दर तीन महिन्यात कार्यशाळा आयोजित करण्याचे आदेशही राज्याच्या पोलीस महासंचालकांना दिले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उपायुक्तांकडे मागितली पाच लाखांची खंडणी, भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ **भाईंदर : सुचिता देशमुख**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उपायुक्त रवी पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे बनावट अश्लील छायाचित्र तयार करून ते प्रसिद्ध करण्याची भीती दाखवत एका इसमाने चक्क पाच लाखांची खंडणी मागितल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

मिरा भाईंदर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची जबाबदारी ही उपायुक्त रवी पवार सांभाळत आहेत. मागील काही दिवसांपासून प्रशासनाने शहरातील अतिक्रमण विरोधी कारवाईला जोर दिल्यामुळे अनेक तक्रारदार हे पवार यांना संपर्क साधत आहेत. तर यातील काही जण हे विरोध म्हणून पवार यांचा द्वेष देखील करत आहे. दरम्यान यातील एका इसमाने पवार व त्यांच्या सहकाऱ्यांचे मोबाईलच्या मदतीने बनावट अश्लील छायाचित्र तयार करून त्यांना विविध माध्यमांमार्फत पाठवण्यास सुरुवात केली आहे. इतकेच नवे तर हे छायाचित्र समाज माध्यमांवर टाकून बदनामी करणार

असल्याचा मजकूर व्हाट्सॲप तसेच महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर पाठवण्यात आला आहे. याशिवाय ही बदनामी थांबवायची असल्यास थेट पाच लाख रुपये द्यावे, अशी खंडणी मागणारा व्हाट्सॲप दूरध्वनी नुकताच पवार यांना आला आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणाची लेखी तक्रार पवार यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यावरून सोमवारी रात्री अनोळखी इसमाविरोधात खंडणी मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच खंडणी मागण्यासाठी वापरण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकाचा व ई-मेल आयडीचा तांत्रिकदृष्ट्या तपास करून आरोपीचा शोध सुरू केला असल्याची माहिती तपास अधिकारी सुधीर गवळी यांनी दिली आहे.तर एका तक्रारदारावर मला दाट संशय असून लवकरच पोलीस तपासात तो समोर आल्यानंतर त्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी मी प्रयत्न करीन अशी प्रतिक्रिया उपायुक्त रवी पवार यांनी दिली आहे.

सिडको वसाहतींमधील २० टक्के पाणी कपात रद्द होणार

पनवेल : जून महिन्याच्या अखेरीस सिडको महामंडळाने हेटवणे धरण क्षेत्रातील जलसाठा कमी असल्याने २० टक्क्यांची पाणी कपात सिडको वसाहतींमध्ये अंमलात आणली. यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी रहिवाशांना विकतचा बाटला खरेदी करावा लागला. परंतू सोमवारी हेटवणे धरण क्षेत्रात मागील चार दिवसात बरसलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील जलसाठा ७० टक्यांवर पोहचला आहे. त्यामुळे लवकरच सिडको वसाहतींमधील पाणी कपात रद्द करण्याचे संकेत सिडको मंडळातील उच्चपदस्थांकडून मिळत आहे.

जून ते जुलै महिन्यात घराबाहेर धो धो पाऊस आणि घरातील नळांना काही मिनिटेच पाणी पुरवठा होत असल्याने खारघर, उलवे आणि द्रोणागिरी या वसाहतींमधील नागरिकांना पाण्याविना जगावे कसा असा प्रश्न पडला होता. मागील

अनेक वर्षात जुलै महिन्यात पाण्याचे दुर्भिक्ष पहिल्यांदा सिडकोवासियांनी अनुभवले. हेटवणे धरण पेण परिसरात आहे. मागील चार दिवसात पेण तालुक्यात ५०० मीलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. हेटवणे धरणाची क्षेत्राची क्षमता १४४ दशलक्ष घनमीटर एवढी असून चार दिवसांपूर्वी ४९ टक्के जलसाठा उपलब्ध होता.

सोमवारी सकाळी हेटवणे धरणात ७० टक्के पाणी साठा असल्याची नोंद धरण व्यवस्थापनाकडे नोंदविली गेल्याने सिडकोवासियांची पाणी कपात लवकरच रद्द होईल, अशी चिन्हे आहेत. मागील महिनाभर उलवे, द्रोणागिरी आणि खारघरमधील वसाहतींना झालेल्या २० टक्के कपात आणि कमी दाबाने झालेल्या पाणी पुरवठ्यामुळे टँकरने पाणी खरेदी करावे लागले. शेकडो रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी किराणा मालाच्या दुकानातून पाण्याचा बाटला खरेदी करुन पाण्याची तहान भागवावी लागली. धरणात असाच पाऊस बरसल्यास ऑगस्ट महिन्यात धरण इशारा पातळी गाठण्याची शक्यता आहे.

सफायर लाईफसायन्स कंपनीला भीषण आग, कामगार सुखरूप, कंपनी जळून खाक

■ **पालघर : सचिन कदम**

पालघर औद्योगिक वसाहतीतील सफायर लाईफसायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला आज दुपारी दोनच्या सुमारास भीषण आग लागली. या औषधनिर्मिती कंपनीतील कामगार सुखरूप असले तरी कंपनी आगीत जळून खाक झाली आहे. पालघर बोईसर मार्गावरील पालघर तालुका औद्योगिक सहकारी वसाहतीमध्ये आज दुपारी दोन वाजल्याच्या सुमारास सफायर लाइफसायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड या औषध निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या पॅकिंग विभागात आग लागली. अग्निशमन व्यवस्था उपलब्ध न झाल्याने आग पसरली. तोवर या

कंपनीमधील ४५० कामगारांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. साडेतीन वाजताच्या सुमारास या कंपनीतील ज्वलनशील रसायन साठवणूक केलेल्या, वातानुकुलीत यंत्रणेचे कॉम्प्रेसर, ड्रम स्फोट झाल्याने या आगीने भीषण रूप घेतले व आग कंपनीभर पसरली. ही आग विझविण्याकरिता पालघर, तारापूर औद्योगिक वसाहत, अदानी पावर डहाणू व वसई विरार महानगरपालिका येथील एकूण सहा अग्निशमन बंबाना पाचारण करण्यात आले. आग नियंत्रणात आणण्यासाठी चार तासांपेक्षा अधिक अवधी लागला. या अपघातामध्ये जीवितहानी झाली नसली तरीही कंपनीचे संपूर्णतः नुकसान झाले आहे. आग लागली तेव्हा पालघर शहराच्या अग्निशामक दलाची गाडी वाडा येथे गेली असल्याने तारापूर औद्योगिक वसाहतीमधील अग्निशामक दलाला पाचरण करण्यात आले. मात्र ही अग्निशमन व्यवस्था कार्यान्वित होईपर्यंत सव्वा ते दीड तासांचा अवधी लागल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. कंपनीमध्ये सर्वत्र तयार व कच्चा मालाची ठेवण्यात आल्याने तसेच अग्निशमन व्यवस्थेला मध्ये जाण्यासाठी मोकळी जागा नसल्याने आग विझवण्यात अनेक अडथळे आले.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.
ई-निविदा सूचना क्रमांक ०२ सन २०२४ -२०२५

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत वर्ग-४ व वरील वर्गाचे योग्य कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	रक्कम
१.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळील बेस्ट थांबा ते रोपवाटीका पर्यंतच्या पदपथाची दुरुस्ती, मजबुतीकरण, नुतनीकरण करणे.	रु.६१,६६,४५८.००
२.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील मुख्य प्रवेशद्वार साईकल स्टँड ते रोपवाटीका पर्यंतच्या पदपथाची दुरुस्ती, मजबुतीकरण, नुतनीकरण करणे.	रु.६२,६०,३२५.००
३.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील गांधी टेकडी परिसराचे सुधारणा , पर्यटन व पर्यावरणपुरक विकास कामे करणे.	रु.५९,४२,२०७.००
४.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील रोपवाटिका ते पोलीस बीट चौकी पर्यंतच्या पदपथाची दुरुस्ती, मजबुतीकरण, नुतनीकरण करणे.	रु.४६,२२,१०६.००
५.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील सिंह/व्याघ्र पर्यटकांकरीता प्रतिक्षा थांबा व सोई सुविधा उपलब्ध करणे.	रु.४०,५२,२८४.००
६.	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय टिकीट खिडकी व स्मरणिका दुकानाच्या बाह्य भागाची दुरुस्ती, नुतनीकरण व सुधारणाची कामे करणे.	रु. ८१,३४,५७१.००

ई - निविदा वेळापत्रक

१	निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी	दिनांक १८/०७/२०२४ @ १५:०० पासून दिनांक २५/०७/२०२४ @ १७:०० पर्यंत.
२	निविदा सादर करण्याचा कालावधी	दिनांक १८/०७/२०२४ @ १५:०० पासून दिनांक २५/०७/२०२४ @ १७:०० पर्यंत.
३	निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास)	दिनांक २६/०७/२०२४ सकाळी ११:०० वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, सा.बां.विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

Sd/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

जा. क्रं. साबांविप्र-आरे/नि.लि./ ७०६९
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- १५/०७/२०२४

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/९५२

सरकारी अधिकाऱ्यांच्या दुटप्पी वृत्तीमुळेच बेकायदा बांधकामे - उच्च न्यायालय

■ मुंबई : नितीन देवळेकर

आवश्यक त्या परवानग्या मिळविण्यासाठी सरकारी अधिकारी सर्वसामान्यांना एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात खेटा घालण्यास भाग पाडतात. दुसरीकडे, बड्या उद्योगांचा प्रश्न आला की हेच सरकारी अधिकारी त्यांच्यासाठी पायघड्या घालतात. सरकारी अधिकाऱ्यांची ही दुटप्पी वृत्ती बेकायदा बांधकामांना जबाबदार आहे, अशा शब्दात उच्च न्यायालयाने सरकारी कारभारावर ताशेरे ओढले. सरकारी अधिकारी सर्वसामान्यांना आवश्यक त्या परवानग्या मिळविण्यासाठी केवळ धावपळ करण्यास भाग पाडतात. आपल्यासमोरील प्रकरणातही याचिकाकर्त्याला परवानगी मिळविण्यासाठी एका अधिकाऱ्याकडून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे पाठवले गेले. परंतु, एकाही अधिकाऱ्याने त्याला मदत केली नाही किंवा कोणतेही स्पष्ट उत्तर दिले नाही, असे खडेबोलही न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने सुनावले.

सर्वसामान्यांना त्रास देऊन तुम्हाला कोणता आनंद मिळतो ? याचिकाकर्त्याचा अर्ज निव्वळ संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या (ईएसझेड) देखरेखीसाठी नेमण्यात

आलेल्या समितीला उद्देशून नसल्यामुळे समिती अर्जावर विचार करू शकत नाही, असे म्हणणे याचिकाकर्त्यासाठी किती निराशाजनक आहे. वनसंरक्षक किंवा राष्ट्रीय उद्यानाच्या संचालकांच्या ऑक्टोबर २०२१ च्या उत्तरातही कोणत्या आधारावर याचिकाकर्त्याचा भूखंड वनक्षेत्रात येतो, याची कोणतीही माहिती नमूद केलेली नाही. समितीचा दृष्टीकोन दुर्दैवी असून अनेक वर्षांपासून रखडलेला याचिकाकर्त्याच्या अर्जाचा समितीने विचार करणे आवश्यक होते, असे ताशेरेही न्यायालयाने ओढले.

याचिकाकर्त्याऐवजी या अधिकाऱ्याकडे बड्या उद्योग चालवणाऱ्यांचे प्रतिनिधी परवानग्यांसाठी आले असते तर कदाचित हे अधिकारी त्यांच्या मागे-मागे फिरले असते, अशी टिप्पणीही न्यायमूर्ती सोनक यांनी केली. त्याचवेळी, देखरेख समितीने याचिकाकर्त्याच्या अर्जावर ३० दिवसांच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्याची मागणी कायद्यानुसार असेल तर समिती त्वरित त्याला ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देईल आणि निर्णय घेण्यास कोणतीही टाळाटाळ करणार नाही, असेही न्यायालयाने बजावले. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमेपासून ३६ मीटर अंतरावर बंगला बांधण्यासाठी याचिकाकर्ते शैलेश मोरे यांनी महापालिका प्रशासनाकडे जुलै २०२० मध्ये अर्ज केला होता. भूमी अभिलेख जिल्हा निरीक्षकांच्या ३१ ऑक्टोबर १९७४ च्या पत्रानुसार, संबंधित जमीन कोणत्याही प्रकारे राष्ट्रीय उद्यानाचा भाग नाही हे स्पष्ट केलेले असतानाही समितीने याचिकाकर्त्याला ना हरकत देण्यास नकार दिला. तसेच, परवानगी मागण्यासाठी समितीऐवजी सदस्य सचिवांचे नाव अर्जात नमूद केल्यामुळे त्यांना परवानगी नाकारण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्याने याचिकेद्वारे केला आहे.

पूजा खेडकरांकडून फसवणूक; केंद्रीय लोकसेवा आयोगाचीच कबुली; नियुक्ती रद्द होण्याची चिन्हे

■ मुंबई : नितीन देवळेकर

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांनी स्वत: तसेच आई-वडिलांचे नाव, छायाचित्र, स्वाक्षरी, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक आणि पत्ता बदलून फसवणूक केल्याचे केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) केलेल्या चौकशीत आढळून आले आहे. त्यामुळे निवड रद्द करण्याबरोबरच त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाणार आहे. तत्पूर्वी त्यांना कारणे दाखवा नोटीस

बजाविण्यात आली आहे.

खेडकर यांनी सादर केलेले दृष्टिदोष प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला यावरून ओरड सुरू होताच केंद्रीय कार्मिक मंत्रालय तसेच यूपीएससीने स्वतंत्र चौकशी सुरू केली होती. यात खेडकरांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता लोकसेवा आयोगाची विविध पातळ्यांवर बनावट कागदपत्रे सादर करून फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सहा वेळा तर ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांना नऊ वेळा संधी मिळते. ओबीसी प्रमाणपत्र सादर केलेल्या खेडकर यांनी या मर्यादेपेक्षा अधिक वेळा परीक्षा देताना स्वत:, आई व वडिलांचे नाव, छायाचित्र, स्वाक्षरी, घरचा पत्ता, ईमेल, भ्रमणध्वनी क्रमांक आदी सारेच बदलल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानंतर कायदेशीर व फौजदारी कारवाई यूपीएससीने सुरू केली आहे. सर्वात आधी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला जाणार आहे.

साथरोग नियंत्रणासाठी समस्याग्रस्त भागांत आरोग्य विभागाची विशेष मोहीम!

■ मुंबई : विशाल कारंडे

सध्या पावसाळ्याचे दिवस असून साथीचे आजार उद्भवू आणि पसरू नये यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने विविध उपाययोजना केल्या जात आहे. राज्यातील समस्याग्रस्त भागांमध्ये राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध प्रकारचे प्रतिबंधात्मक उपाय योजना केल्या जात आहेत. राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप समस्याग्रस्त भाग गडचिरोली तसेच गोंदिया आणि चंद्रपूर येथे विशेष मोहीम आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात येत आहे. या तीन जिल्ह्यांमध्ये आरोग्य विभागामार्फत फवारणी मोहीम चालू आहे.पावसाळ्याच्या दिवसांमध्ये डास नियंत्रणासाठी उपाययोजना म्हणून राज्यातील हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक व उद्रेकग्रस्त गांवामध्ये कीटकनाशकाची

घरोघर फवारणी करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे तापाच्या साथीच्या नियंत्रणासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे ताप रुग्ण सर्वेक्षण आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, आशा यांच्यामार्फत मोहीम राबविली जात आहे. या मोहिमे अंतर्गतरक्तनमुने तपासणी अंती हिवताप नसल्याचे आढळल्यास, संशयित ताप रुग्णांचे रक्तजल नमुने घेऊन एन.आय.व्ही. पुणे तसेच राज्यातील निवडक ४३ सेंटीनल सेंटर येथे विषाणू परीक्षणासाठी पाठविले जातात.

एडिस एजिप्ताय डासांचे नमुनेही विषाणुंचा प्रकार ओळखण्यासाठी एन. आय.व्ही.पुणे कडे तपासणीसाठी पाठविले जातात. उद्रेकग्रस्त भागात धूर फवारणी केली जाते.घरातील व परिसरातील डासअळया आढळून आलेल्या पाण्याच्या साठ्यामध्ये अळीनाशक टेमिफॉस वापरले जाते तर कायमस्वरुपी पाणीसाठ्यामध्ये गप्पीमासे सोडले जातात.

रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकास : १६ हजार ५७५ पैकी केवळ ७ हजार ५२९ रहिवासी पात्र

■ मुंबई : विशाल कारंडे

घाटकोपरमधील माता रमाबाई आंबेडकर नगर पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात येणार असून माता रमाबाई आंबेडकर नगरमधील १६ हजार ५७५ पैकी केवळ ७ हजार ५२९ रहिवासी पात्र ठरले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने नुकत्यात प्रसिद्ध केलेल्या परिशिष्ट २ मध्ये रमाबाई नगरातील ६ हजार ५००, तर याआधी प्रसिद्ध केलेल्या परिशिष्ट २ मध्ये १०२९ असे एकूण ७ हजार ५२९ रहिवासी पात्र ठरले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) पूर्वमुक्त मार्गाचा विस्तारीकरण प्रकल्प हाती घेणार आहे. या

विस्तारीकरणातील बाधित झोपड्यांसह एकूण १६ हजार ५७५ झोपड्यांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे. झोपु आणि एमएमआरडीए संयुक्त भागिदारीतून बाधितांचा पुनर्विकास मार्गी लावणार आहे. त्यानुसार पात्रता निश्चितीची जबाबदारी झोपुवर असून झोपड्यांचे सर्वेक्षण पूर्ण करून दोन वेळा परिशिष्ट २ प्रसिद्ध करण्यात आले आहे. झोपुने आधी विस्तारीकरण प्रकल्पात थेट बाधित होणाऱ्या १६९४ रहिवाशांचे सर्वेक्षण पूर्ण करून परिशिष्ट २ प्रसिध्द केले होते. यात १०२९ रहिवासी पात्र ठरले आहेत. तर गुरुवारी दुसरे परिशिष्ट २ प्रसिद्ध करण्यात आले.

घाटकोपरमधील महाकाय फलक दुर्घटना : जामिनासाठी अजब दावा करणाऱ्या भावेश भिंडेच्या याचिकेवर भूमिका स्पष्ट करा, उच्च न्यायालयाचे पोलिसांना आदेश

■ मुंबई : गणेश जागडे

घाटकोपर येथील महाकाय जाहिरात फलक कोसळण्याची घटना हे प्राक्तन होते, असा अजब दावा करून जामिनाची मागणी करणारा प्रकरणातील मुख्य आरोपी आणि जाहिरात कंपनीचा संचालक भावेश भिंडे याच्या याचिकेवर तपशीलवार म्हणणे सादर करा, असे आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुंबई पोलिसांना दिले. भिंडे याने याचिकेत बेकायदेशीर अटकेचा मुद्दा देखील उपस्थित केला आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (सीआरपीसी) कलम ४१ अ अंतर्गत अटकेपूर्वी आरोपीला नोटीस बजावणे अनिवार्य आहे. परंतु, आपल्याला या नोटिशीविना अटक करण्यात आली, असा दावा भिंडे याने केला असल्याकडे न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे

यांच्या खंडपीठाने लक्ष वेधले. तसेच, बेकायदेशीररित्या नजरकैदेत ठेवल्यास तात्काळ सुटका करावी लागेल, असे अनेक निवाडे असल्याने याबाबतही पोलिसांना आपली भूमिका स्पष्ट करावी लागेल, असे स्पष्ट केले. त्यावर, भिंडे याने याचिकेत उपस्थित केलेल्या सगळ्या मुद्द्यांवर सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात येईल, असे सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाला सांगितले. त्यानंतर, न्यायालयाने प्रकरणाची सुनावणी २६ जुलै रोजी ठेवली. दरम्यान, या प्रकरणी आपल्याविरोधात करण्यात आलेले आरोप हे निरर्थक आणि बेकायदेशीर आहेत, असा दावा करून गुन्हा रद्द करावा आणि याचिकेवर अंतिम निर्णय दिला जाईपर्यंत आपल्याला जामीन मंजूर करावा, अशी मागणी भिंडे याने केली आहे. घटनेच्या दिवशी म्हणजेच १३ मे रोजी वादळी वाऱ्यासह धुळीचे वादळ येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यास भारतीय हवामान विभाग अपयशी ठरला. त्या दिवशी अनपेक्षितरीत्या ताशी ९६ किमी प्रतितास वेगाने वारे वाहू लागले. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे हा महाकाय जाहिरात फलक कोसळला आणि त्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी दाखल गुन्ह्यातही बांधकामातील निष्काळजीपणामुळे फलक कोसळल्याचे नमूद केलेले नाही. त्यामुळे, तो महाकाय जाहिरात फलक कोसळणे ही नियती होती व त्यासाठी आपल्याला किंवा इगो मीडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला दोषी धरता येणार नाही, असा दावा भिंडे याने याचिकेत केला आहे.

'मुंबईला अदाणी सिटी करण्याचा मोदी-शाहांचा डाव', उद्धव ठाकरेंची घणाघाती टीका

■ मुंबई : नितीन देवळेकर

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महाबिघाडी सरकारकडून फसव्या योजनांचा पाऊस पाडायला लागले आहे. त्यांचा आतापर्यंतचा कारभार विसरून आणि फसव्या योजनांना भुलून जनता मतदान करेल, अशी त्यांची वेडी आशा आहे. या योजनांमध्ये लाडकी बहीण, लाडका भाऊ अशा योजना आहेत. याशिवाय लाडका मित्र, लाडका कंत्राटदार किंवा लाडका उद्योगपती ही योजनाही सरकारने आणली आहे. या योजनेविरोधात मागच्या वर्षी मोर्चा काढला होता. धारावी पुनर्वसन प्रकल्पात धारावीकरांना हक्काचे घर त्याचठिकाणी ५०० चौरस फूटांचे असले पाहीजे, अशी शिवसेनेची भूमिका आहे.

मुंबईला अदाणी सिटी करण्याचा डाव

धारावी ही केवळ झोपडपट्टी नाही. तिथल्या प्रत्येक घरात कुटीरद्योग चालतो. अनेक छोटे छोटे उद्योग याठिकाणी चालतात. त्या उद्योगांचे काय होणार? हा प्रश्न आहे. सरकारने याठिकाणी बेसुमार टीडीआर काढून अदाणीला देण्याचा त्यांचा डाव आहे, तो कधीही यशस्वी होऊ देणार नाही. मुंबईभर अदाणींकडून टीडीआर विकत घेतला पाहीजे, ही अट आता राज्य सरकारने टाकली आहे. त्याविरोधात आम्ही दंड थोपटले आहेत. मागच्या आठवड्यात काही बातम्या आल्या आहेत. मोदी आणि शाह यांनी मुंबईची गिफ्ट सिटी गुजरातला पळून नेलेली आहे आणि मुंबईला अदाणी

सिटी करण्याचा त्यांचा डाव आहे. उद्या कदाचित हे मुंबईचे नाव बदलून अदाणी सिटी करतील, पण आम्ही ते कदापी होऊ देणार नाही, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरेंनी केली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. मराठी माणूस पेटला तर अनेकांच्या डोक्यातील हवा बाहेर काढतो आणि मुंबई वाचवतो, हा इतिहास आहे. मुंबईला लुटण्याचे आणि मुंबईची तिजोरी रिकामी करण्याच जे चाळे सुरू आहेत, ते आम्ही होऊ देणार नाही. राज्य सरकारने अदाणींना जेव्हा टेंडर दिले, तेव्हा त्यात नसलेल्या गोष्टी ते आता अदाणीला देऊ करत आहेत. वारेमाप एसएफआय अदाणींना देण्याचे कारस्थान रचले जात असल्याची टीका उद्धव ठाकरेंनी केली.

१३ अभियंत्यांना महापालिकेची नोटीस, खड्ड्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे कारवाई

■ मुंबई : नितीन देवळेकर

वेळेवर खड्डे न बुजवल्यामुळे महापालिका प्रशासनाने १३ दुय्यम अभियंत्यांना नोटीस बजावली आहे. खड्डे वेळेत का बुजवले नाहीत, अशी विचारणा करणारी 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. जोगेश्वरी – विक्रोळी जोड मार्ग, भांडुप, नाहूर येथील खड्ड्यांप्रकरणी ही नोटीस बजावण्यात आली आहे. मुंबईत पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदा मुंबईत खड्डे दिसू लागले आहेत. पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडून मुंबईकरांना त्रासाला सामोरे जावे लागू नये म्हणून मुंबई महापालिकेने यंदा विशेष काळजी घेतली होती. पालिकेच्या एकूण २२७ बीटसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे दुय्यम अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली होती. या दुय्यम अभियंत्यांना नेमून दिलेल्या विभागात त्यांनी दररोज रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून खड्डे आढळल्यास ते

तत्काळ बुजवण्याचे आदेश पालिका अधिकाऱ्यांनी आधीच दिले होते. यानुसार आतापर्यंत सहा हजारांहून अधिक खड्डे पालिकेने बुजवले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मात्र काही ठिकाणी रस्त्यांवर खड्डे तसेच असून खड्डे वेळीच न बुजवल्यामुळे ते मोठे झाले आहेत. तसेच दुय्यम अभियंत्यांना जबाबदार धरण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील खड्ड्यांवरून पुन्हा टीकाही सुरू झाली आहे. मुंबईत पाच हजार नाही तर २५ हजार खड्डे असल्याचा आरोप माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केला होता. त्यातच गुरुवारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी साहाय्यक आयुक्तांची बैठक घेऊन तत्काळ खड्डे बुजवण्याचे निर्देश दिले. गेल्या आठवड्यात मुंबईत दिवसभरात ३०० मिमी पाऊस पडला. त्यामुळे विविध ठिकाणच्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां.विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक २३.७.२०२४ ते ३०.७.२०२४ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक ३१.७.२०२४ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

अ.क्र.	कामांचे नांव	अंदाजित किंमत (रु. लाखांत)	इसारा रक्कम (रुपये)	काम पूर्ण करण्याची कालमर्यादा	निविदेचा नमूना प्रकार	कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत
१	मंत्रालय मुंबई विस्तार इमारत रूम नं. ५२६ निवडणूक शाखा कर्मचारी कार्यालय नुतनीकरण करणे.	३,९८,८४०/-	४,०००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
२	एल.टी.मार्ग मुंबई येथील सी.पी.ऑफीस प्रिमाईस बी. ब्लॉक रूम नं. २३,२७,३१ येथील १ ल्या मजल्यावरील पोलीस कॉन्स्टेबल क्वॉटर्स येथे नुतनीकरण करणे.	८,४२,६२५/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
३	पोलीस मुख्यालय मुंबई येथील सन्मान गार्ड रूम येते दुरूस्ती व नुतनीकरण करणे.	२,३१,३६६/-	२,४००/-	४ महिने	ब-१	रु. ३३६/-
४	पोलीस मुख्यालय मुंबई येथील ड्राईव्हर रेस्ट रूम येते दुरूस्ती व नुतनीकरण करणे.	२,११,२५४/-	२,२००/-	४ महिने	ब-१	रु. ३३६/-
५	एम.टी.एन.एल फाऊंटन इमारत मुंबई येथील मजल्यावरील सरकारी दवाखाना कार्यालय येथे खराब, कॉलम, बीम यांची मजबूती करणे व दुरूस्ती करणे.	२,०४,९८४/-	२,१००/-	४ महिने	ब-१	रु. ३३६/-
६	एल.टी.मार्ग मुंबई येथील सी.पी. ऑफीस अ ब्लॉक रूम नं. ६,७,५४ येथील पोलीस कॉन्स्टेबल क्वॉटर्स येथे नुतनीकरण करणे.	८,४१,९२४/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
७	एल.टी.मार्ग मुंबई येथील सी.पी.ऑफीस अ ब्लॉक रूम नं. १४,१७,१९ येथील पोलीस कॉन्स्टेबल क्वॉटर्स येथे नुतनीकरण करणे.	८,४२,८२०/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
८	उच्च न्यायालय मुंबई पीडब्ल्युडी विस्तार इमारती तळमजल्यावरील रिट डिपार्टमेंट समोरील महिला प्रसाधनगृह व रूम येथे नुतनीकरण करणे.	७,६१,१२६/-	७,७००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
९	घर्नी रोड येथील गावदेवी पोलीस स्टेशन येथील जिम मध्ये छत मंगलोरी छत आणि फॉल्स सिलींगची नुतनीकरण करणे.	७,५५,९७७/-	७,६००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
१०	घर्नीरोड मुंबई येथील DGPS इमारत येथील १ल्या मजल्यावरील वेटींग रूम मध्ये प्लास्टर, रंगकाम व दुरूस्ती करणे	८,४१,४३४/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
११	घर्नीरोड मुंबई येथील DGPS इमारत येथील तळ मजल्यावरील वेटींग रूम डेपो कार्यालय, दिल्ली केंद्र येथे प्लास्टर, रंगकाम, दुरूस्ती करणे.	८,४३,१५७/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-
१२	एल.टी.मार्ग मुंबई येथील सी.पी.ऑफीस प्रिमाईस बी. ब्लॉक रूम नं. १७,१५,२६ येथील तळ मजल्यावरील पोलीस कॉन्स्टेबल क्वॉटर्स येथे नुतनीकरण करणे.	८,४२,१९१/-	८,५००/-	४ महिने	ब-१	रु. ५९०/-

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द उरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निवि/ ९८८६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- १८/७/२०२४

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/११२१

(व्ही. ए. प्राटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

वाचाल तर वाचाल...!

राज्यातील सर्व माध्यमांच्या; तसेच सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात 'महावाचन उत्सव-२०२४' हा उपक्रम राबविण्याची घोषणा सरकारने केली आहे. या उपक्रमाचे ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून अभिनेते अमिताभ बच्चन यांची निवड केली आहे. हा उपक्रम २२ जुलै ते ३० ऑगस्ट दरम्यान राबविला जाईल. इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते बारावी अशा तीन गटांत विद्यार्थ्यांचा सहभाग असेल.

उपक्रमासाठी स्वतंत्र वेब पोर्टल असणार आहे. वाचन केलेल्या पुस्तकावर विचार करून तो विचार लिखित स्वरूपात संबंधित पोर्टलवर सहभागी विद्यार्थ्याला अपलोड करावा लागणार, पुस्तकाचा सारांश देणारा एका मिनिटाची ध्वनिचित्रफीत, ध्वनिफीत पोर्टलवर अपलोड करावी लागणार, तालुका, जिल्हा, शैक्षणिक विभाग, राज्यस्तरावर विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके ही या उपक्रमाची काही वैशिष्ट्ये.

संस्कृतमध्ये वाचन हा शब्द 'वच' या धातूपासून तयार झाला असून 'वच' म्हणजे बोलणे आणि 'वाच' म्हणजे बोलावयास लावणारे. वाचनाचे ढोबळ अर्थाने फायदे बघितले तर वाचन सर्जनशील होण्यास मदत करते, अधिक संवेदनशील बनवते, अधिक चांगले संवाद साधण्यास मदत करते, दररोज काही वेळ वाचण्याची सवय

लावून आपण आपले ज्ञान, भाषा कौशल्ये, विचार कौशल्ये आणि मानसिक आरोग्य सुधारू शकतो. 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण प्रचलित आहे. तिचे मर्म जाणून प्रयत्न करायला हवेत. 'महावाचन उत्सव-२०२४' हा शालेय मुलांसाठी उपक्रम असल्यामुळे त्यांना 'घोकंपट्टी' आणि 'वाचन' यातला फरक समजावून सांगणे गरजेचे आहे. आकलनासह केलेले ध्वनिउच्चारण म्हणजे 'वाचन', हे त्यांना पटवून द्यावे लागेल. अक्षर ध्वनीच्या मोठ्या आवाजातील उच्चारणाला 'प्रकटवाचन' म्हणतात.

आरटीई कायद्यातील दुरुस्ती घटनाबाह्य, उच्च न्यायालयाचा निर्वाळा

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

विनाअनुदानित शाळांनाही शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) राखीव आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी आरक्षित असलेल्या २५ टक्के जागांवरील प्रवेश द्यावेच लागतील, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. प्रवेश प्रक्रियेतून खासगी विनाअनुदानित शाळा वगळण्याचा राज्य सरकारचा निर्णय उच्च न्यायालयाने शुक्रवारी घटनाबाह्य ठरवला. यासंदर्भातील राज्य सरकारचे ६ मार्च रोजीचे परिपत्रकही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने रद्द केले. मात्र, दुरुस्तीला स्थगिती देण्यापूर्वी खासगी शाळांनी या कोट्यातून दिलेले प्रवेश तसेच राहतील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचवेळी, २५ टक्के कोट्यातील प्रवेश भरले जातील, असेही न्यायालयाने राज्य सरकारचा निर्णय घटनाबाह्य ठरवताना नमूद केले. न्यायालयाने ६ मे रोजी सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिली होती व प्रवेश प्रक्रिया आधीच्या नियमानुसार राबवण्याचे आदेश दिले होते. राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधातील याचिकांवरील निर्णय उच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात राखून ठेवला होता. त्यावर, न्यायालयाने शुक्रवारी उपरोक्त निर्णय दिला. दरम्यान, आरटीई प्रवेशांची वाढती संख्या आणि त्यामुळे येणाऱ्या आर्थिक अडचणींमुळे कायद्यात दुरूस्ती करण्यात आल्याचा दावा सरकारने निर्णयाच्या समर्थनार्थ युक्तिवादाच्या वेळी केला होता. मात्र, न्यायालयाने त्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावे आणि कोणीही प्राथमिक शिक्षण मिळण्यापासून वंचित राहू नये यासाठी सरकार बांधील आहे. सरकार आपले कर्तव्य पार पाडत आहे. परंतु, सरकारी शाळांतील प्रवेश घटत चालले आहेत. याउलट, आरटीई प्रवेशासाठी राखीव असलेल्या जागांच्या तुलनेत येणाऱ्या अर्जांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, सरकारी शाळेतील शिक्षक अतिरिक्त झाले आहेत.

शिक्षणासाठी कोट्यवधी रुपये खर्च केला जातो. आर्थिक अडचणीही सरकारला भेडसावत आहेत. याशिवाय, आरटीईअंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा आठवीपर्यंतच्या शिक्षणाचा खर्च सरकारतर्फे उचलला जातो. खासगी शाळेतील नववी, दहावीचा खर्च गरीब कुटुंबाला परवडणारा नाही. शिवाय, खासगी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. त्यासाठी स्वतंत्र शुल्क आकारले जाते. हे शुल्क न भरल्याने मुलाला विविध उपक्रमात सहभागी होता येत नाही. गरीब विद्यार्थ्यांचे खच्चीकरण होते, असा दावा अतिरिक्त सरकारी वकील ज्योती चव्हाण यांनी कायदा दुरूस्तीचा निर्णय का घेण्यात आला आणि तो योग्य कसा हे न्यायालयाला पटवून देताना केला होता. मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू नये याची आणि त्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी पूर्णपणे सरकारची आहे. सरकारने दर्जेदार शाळा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. परंतु, सरकार आपले हे घटनात्मक कर्तव्य बजावण्यात अपयशी ठरले आहे, असा दावा खासगी शाळांच्यावतीने करण्यात आला. न्यायालयाचा अंतरिम स्थगितीचा निर्णय हा व्यावसाय करण्याच्या आपल्या मूलभूत अधिकारांचे उल्लघन असल्याचा दावाही शाळांतर्फे करण्यात आला.

अधिसभा निवडणूक टाळण्यावर भर? मुंबई विद्यापीठाकडून वेगवेगळ्या कारणांचे पालुपद; दिरंगाईबद्दल विद्यार्थी संघटना आक्रमक

■ **मुंबई : यश सावंत**

दोन वर्षांचा कालावधी उलटूनही मुंबई विद्यापीठाला नोंदणीकृत पदवीधर गटाच्या अधिसभा निवडणुकीला मुहूर्त मिळालेला नाही. मतदारयादीवरील आक्षेप, त्याबाबत न्यायालयातील याचिका आणि त्यानंतर लोकसभा निवडणूक आचारसंहिता अशी कारणे पुढे करीत विद्यापीठाने अधिसभेच्या पदवीधर गटाची निवडणूक पुढे ढकलली आहे. निवडणुकीचे वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. काही महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या असून विद्यापीठाला निवडणुका टाळण्यास नवे कारण मिळणार अशी धास्ती विद्यार्थी संघटनांना वाटू लागली आहे. निवडणुकीला रातोरात स्थगिती, राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि न्यायालयातील लढाई आदी विविध कारणांमुळे नोंदणीकृत पदवीधर गटाची अधिसभा निवडणूक सुरुवातीपासूनच चर्चेची ठरली आहे. दोन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही निवडणूक झालेली नाही. अनेक वादविवाद, आक्षेप, न्यायालयीन प्रकरणे यानंतर मतदार नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली. मात्र, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे निवडणुका घेता येणार नाहीत, अशी भूमिका विद्यापीठाने घेतली. पुढील दोन, तीन महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका जाहीर होतील आणि त्याची आचारसंहिता लागेल. मात्र, त्यापूर्वी अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण व्हावी याची कोणतीही धावपळ विद्यापीठात सुरू नाही. विद्यापीठ प्रशासनानाने नोंदणीकृत पदवीधरांची तात्पुरती मतदारयादी व अपात्र ठरलेल्या अर्जांची कारणासहित यादी चार महिन्यांनंतर ४ जुलै रोजी जाहीर केली. सुधारित मतदारयादीनुसार १३, ४०४ पदवीधरांचे मतदार अर्ज पात्र, तर विविध कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे १३, ५४० पदवीधरांचे मतदार अर्ज अपात्र ठरले आहेत. या सुधारित यादीत काही वगळलेल्या वा चुकीच्या नोंदी निदर्शनास आल्यास या नोंदींबाबत स्पष्टीकरणासह मंगळवार, ९ जुलैपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने कुलगुरुंकडे अपिलाद्वारे निदर्शनास आणून द्यायचे होते. त्यानंतर १८३ जणांनी कुलगुरुंकडे अपिलाद्वारे आक्षेप नोंदवले. मात्र, १० दिवसांनंतरही या आक्षेपांवर निर्णय झाला नाही. त्यामुळे विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे प्रश्न, संलग्नित महाविद्यालयांचे प्रश्न, परीक्षांचा घोळ, आदी समस्या विद्यापीठापर्यंत पोहोचवणाऱ्या प्रतिनिधींना कधीपर्यंत बाहेर ठेवणार, अशी प्रतिक्रिया संघटनांनी व्यक्त केली. निवडणुकीबाबत वेळकाढूपणा सुरु आहे. सुधारित मतदारयादीनंतर १८३ आक्षेपांवर निर्णय घ्यायला, कितीसा वेळ लागतो? नोंदणीकृत पदवीधर गटाची अधिसभा निवडणूक घेण्याची इच्छाशक्ती असती, तर कुलगुरूंनी १८३ आक्षेपांवर केव्हाच निर्णय घेतला असता.

प्राधिकरणांमधील वाद चिघळण्याची चिन्हे; एमएमआरडीएला पूर्ण रक्कम देण्यास पालिकेचा नकार

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

मुंबईत मेट्रो प्रकल्पाच्या खर्चाचा काही भाग म्हणून एमएमआरडीएने मुंबई महापालिकेकेड तीन हजार कोटींची मागणी केली होती. मात्र दोन हजार कोटी आधीच देण्यात आले असून उर्वरित एक हजार कोटींपैकी केवळ पाचशे कोटी देण्यात येतील, अशी भूमिका महापालिकेने घेतली आहे. त्यामुळे दोन प्राधिकरणांमधील वाद विकोपाला जाण्याची चिन्हे आहेत. राज्य सरकारने पायाभूत सुविधेच्या खर्चाचा २५ टक्के हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकला आहे. त्यानुसार मुंबईतील मेट्रो प्रकल्पांसाठी एमएमआरडीएने महापालिकेकडे तीन हजार कोटींची मागणी केली आहे. याबाबत नगरविकास विभागाने मुंबई महापालिकेकडे विचारणा केली. मात्र निधीअभावी खर्चातील काही वाटा देणे तूर्तास शक्य नाही, अशी भूमिका महापालिकेने घेतली होती. मात्र आता पालिकेने केवळ पाचशे कोटी देण्याची तयारी दर्शविल्यामुळे दोन प्राधिकरणांमध्ये वाद निर्माण झाला झाला आहे. २०१५-१६ मध्ये सरकारने बांधकामातून मिळणाऱ्या अधिमूल्याची रक्कम दुप्पट केली. हे अधिमूल्य मुंबई महापालिकेकडे जमा होते. यातूनच विविध प्रकल्पांसाठी पैसा दिला जात असतो.

फुटीर आमदारांवर कारवाई: काँग्रेसने नावे जाहीर करण्याचे टाळले

■ **मुंबई : गणेश बागडे**

विधान परिषदेत विरोधात मतदान केलेल्या आमदारांच्या विरोधात पक्षाने कारवाई केली असून, भविष्यात काय कारवाई केली हे स्पष्ट होईल, असे काँग्रेसचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणूगोपाळ यांनी शुक्रवारी सांगितले असले तरी पक्षाने या आमदारांची नावे जाहीर करण्याचे टाळले. फुटीरांमधील दोन नावांमुळे पक्षाची पंचाईत झाल्याचे सांगण्यात येत आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसची सात मते फुटल्याचा संशय आहे. विरोधात मतदान केलेल्यांच्या विरोधात तात्काळ कारवाई केली जाईल, असे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जाहीर केले होते. पण आठवडा उलटला तरी कारवाईबाबत पक्षाकडून अद्याप काहीच जाहीर करण्यात आलेले नाही. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी पक्षाचे संघटन सरचिटणीस के. सी. वेणूगोपाळ आणि पक्षाचे राज्याचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत प्रदेश कार्यकारिणीची बैठक पार पडली. फुटीर आमदारांच्या विरोधातील कारवाई जाहीर केली जाईल, अशी प्रदेश पदाधिकाऱ्यांना अपेक्षा होती.

'फुटीर आमदारांची नावे आम्हाल समजली आहेत. त्यांच्या विरोधात कारवाई झाली आहे. ही कारवाई काय करण्यात आली हे लवकरच समजेल, असे मोघम उत्तर के. सी. वेणूगोपाळ यांनी पत्रकार परिषदेत दिले. एरव्ही कारवाई झालेल्या आमदारांची नावे जाहीर करून त्यांची पक्षातून हकालपट्टी केल्याची घोषणा केली जाते. पण आज फक्त कारवाई झाली एवढेच वेणूगोपाळ यांनी सूचित केले. पण नेमकी कोणत्या आणि किती आमदारांच्या विरोधात कारवाई झाली याची माहिती देण्याचे टाळण्यात आले.

बंदी काळात मासेमारी करणाऱ्या तीन नौकांवर मत्स्य विभागाची कारवाई

■ **रत्नागिरी : आकांक्षा नार्वेकर**

मत्स्य विभागाने एक जूनपासून मासेमारीसाठी बंदी लागू केलेली आहे. तरी देखील बंदी कायद्याचे उल्लंघन करुन मासेमारी करणाऱ्या रत्नागिरीतील तीन मासेमारी नौकांवर मत्स्य विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सदतीस हजार रुपयांचे मासे मत्स्य विभागाने जप्त केले.

मत्स्य व्यवसाय खात्याकडून दरवर्षी पावसाळ्यात मासेमारी बंदी करण्यात येते. एक जून ते एकत्तीस जुलै या कालावधीत ही बंदी लागू करण्यात येते. या कालावधीत मासे प्रजनन करीत असल्याने ही बंदी लागू करण्यात येत असते. मात्र ही बंदी धुडकावून रत्नागिरीच्या समुद्रात मजीद भाटकर आणि मुकद्दर बोरकर या दोघांच्या मालकीच्या तसेच जयगड समुद्रात लिना बिर्जे यांच्या मालकीच्या नौकांना पकडण्यात आले. या तिघांवर मत्स्य विभागाचे परवाना अधिकारी चिन्मय जोशी आणि स्मितल कांबळे यांनी कारवाई केली. याप्रकरणी सहाय्यक मत्स्य आयुक्तांच्या समोर लवकरच सुनावणी होवून तिन्ही नौका मालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

एक होती इर्शाळवाडी...

सह्याद्रीच्या कुशीत पहुडलेल्या शेकडो वाड्या-वस्त्यांपैकी ठाकर समाजाची जेमतेम चाळीस उंबरठे असलेली इर्शाळवाडी. या शिवकालीन वाडीत कधीकाळी एखाद दुसरं ठाकर कुटुंब तेथील बारमाही झऱ्यांच्या सान्निध्यात विसावलं, काळाच्या ओघात विस्तारत गेलं. अशा विस्तारण्यातून परिसरात वृक्षतोड, जमिनीचे सपाटीकरण, चर, घरबांधणी अशा मानवी अतिक्रमणामुळे वाडीमागील डोंगरउतार अस्थिर होऊ लागला, दरड घसरण्याची लक्षणे उमटू लागली. गेल्या दशकातील माळीण, जुई-दासगाव, तळीये येथील दुर्घटनेत शेकडो जीव गेल्याच्या बातम्यांमुळे वाडी भयग्रस्त झाली होती. स्वतः पुढाकार घेऊन अतिवृष्टीदरम्यान तात्पुरत्या स्थलांतरासाठी सुरक्षित परिसरात त्यांनी शेड्स उभारल्या त्या नेमक्या वनखात्याच्या जमिनीवर. म्हणजे अतिक्रमण झाले. ते तात्काळ हटविले गेले, हे ओघाने आलेच.

या वाडीभोवतालच्या निसर्गाला बंधने अशी नव्हतीच. ऋतूचक्रानुसार बदलणारे हवामान, मातीचे स्वरूप, उपलब्ध होणारी फणस, गावठी केळी, जांभळं- करवंद, त्यांच्या जोडीला रानटी चविष्ट भाज्या सारे विपुल. जंगलात दडलेल्या वाडीला सुक्या सरपणाचा काय तोटा? कधी नजीकच्या जलाशयात जाळ फेकून मिळवलेली मासळी, चिंबोऱ्या, खेकडे, मुठ्या.... कधी चुलीवर शिजायला तर कधी भाजायला टाकल्यावर सुटणारा दरवळ... सारं जीवन निसर्गाशी समरस झालेलं. वाडीतील इरसाई देवी हे ठाकर समाजातील पारधी, वाघ, भवार, डोरे कुटुंबीयांचं श्रद्धास्थान. पावसाळ्याच्या तोंडावर ढोलकी ताशाच्या निनादात, पारंपरिक दागिने, वेश परिधान करून, नाचत बागडत साऱ्यांनी देवळाकडे प्रस्थान ठेवायचं. देवीचं नारळ ओटी देणं द्यायचं. घराघरांत गोडधोड करायचं. नंतर तुकड्या तुकड्यात वाटल्या गेलेल्या जमिनीची नांगरणी करायची. पावसाबरोबर भातपेरणी, इतर वेळी नाचणी, वरई पिकवायची हा रिवाज या वेळीही पाळला गेला.

जूनअखेरीस पावसाचे आगमन झाले. जुलैच्या मध्यावर पावसाचा जोर वाढत गेला. निसर्गाने रौद्र रूप धारण केले. वादळी वारे, अतिवृष्टी, आठवडाभर सूर्यदर्शन नव्हते. दिनांक १९च्या रात्री वाडीतील घराघरात पाणी घुसू लागले, भिंती पडू लागल्या तर फरशा उचकटल्या गेल्या. इर्शाळवाडीकर हतबल झाले. काय करायचे, कुठे जायचे, जीव कसा वाचवायचा या चिंतेत असतानाच माती, मुरूमाचा लोळ अर्ध्या वाडीला आणि ८४ जीवांना पोटात घेऊनच शांत झाला. सह्याद्रीच्या कुशीतील आणखी एक वाडी नकाशावरून पुसली गेली.

पनवेलसारख्या महानगराच्या कोलाहलापासून म्हटलं तर हाकेच्या अंतरावर समुद्रसपाटीपासून साडेतीनशे-चारशे फूट उंचीवर वसलेली ही वाडी. तेथे पोहोचायचे म्हणजे चारचाकी सोडाच पण दुचाकीही कामाची नाही. चौक गावापासून दोन किलोमीटर अंतर तोडत डोंगराच्या पायथ्याशी पोहोचायचं. तिथून पायवाटेने झपझप डोंगर चढत, तासाभरात वाडीला पोहोचायचं. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केलेल्या ग्रामीण भारतातील शिवकालीन वाडीची ही दशा. तेथे 'एनडीआरएफ'च्या जवानांना मदतकार्य करणेही अवघड गेलं. गाडलेल्या मृतदेहांपैकी फक्त वीस हाती लागले. त्यांचेही दहन करता न आल्याने पुनश्च खड्डे खोदून चिरशांती द्यावी लागली. दरडीची लक्षणे दिसल्यामुळे गावकऱ्यांनी बांधलेल्या तात्पुरत्या शेड्स न पाडण्याचे औदार्य वनखात्याने दाखविले असते तर हे जीव वाचले नसते का? डोंगर घसरतात; पण त्याचबरोबर अस्थिरता, अंधकारमय भविष्य अशा चिंतांचे डोंगर उभे राहतात. कसं सहन करत असतील हे सारं दरडग्रस्त? कशी समजावून घ्यायची त्यांची मानसिकता? कशी द्यायची उभारी भंगलेल्या आयुष्यांना, भविष्यातील स्वप्नांना?

भूस्खलनाच्या छायेत

कोकणपट्टी आणि सह्याद्रीतील अकरा जिल्ह्यांतील ७० तालुक्यांत पसरलेल्या शेकडो वाड्या आज भूस्खलनाच्या छायेत आहेत. यंदा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने ११ जिल्ह्यातील ४८३ वाड्यावस्त्या दरडग्रस्त म्हणून घोषित केल्या आहेत. यामध्ये 'झीरो कॅझ्युअँलिटी मिशन' अर्थात 'जीवितहानीविरहित आपत्ती व्यवस्थापन' राबवावे यासंबंधीचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. ही संकल्पना उचित असली तरी त्यातील व्यवहार्यता लक्षात घेणे आवश्यक आहे. आज सह्याद्रीपासून ते थेट समुद्रकिनाऱ्यापर्यंतचा परिसर केवळ भूस्खलन आणि महापूर नव्हे तर भूकंप, चक्रीवादळ या समस्यांच्या छायेत आहे. त्यामध्ये सर्वार्थाने सुरक्षित जागा शोधणे आणि शेकडो वाड्यावस्त्यांचे 'कायमस्वरूपी पुनर्वसन' करणे ही प्रक्रिया वेळ घेणारी आहे. त्याला पर्याय म्हणून धोक्याची लक्षणे दिसताच 'तात्पुरते स्थलांतर' हा व्यवहार्य मार्ग आहे. 'चिपको' आंदोलनानंतर मध्यवर्ती सरकारने फॉरेस्ट राईट ॲक्ट २००६'अन्वये आदिवासींचा वनसंपत्तीवरील अधिकार अधोरेखित केला आहे. भारतातील बहुतेक राज्यांमध्ये त्याची अंमलबजावणी होत आहे. आपण मात्र त्यात पिछाडीवर आहोत. आदिवासींचे कायमस्वरूपी पुनर्वसन किंवा तात्पुरते स्थलांतर या संदर्भात या कायद्याचा विचार होणे आवश्यक आहे. अर्थात त्यासंबंधी धोरण आखताना त्यात 'डोंगर विकास' नव्हे तर 'डोंगर संरक्षण' प्राधिकरणाचा समावेश होणे आवश्यक आहे. भूस्खलनासारख्या समस्या मानवी अतिक्रमणामुळे घडतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

इंग्रजीत 'द मोस्ट डेंजरस प्लेस ऑन अर्थ इज व्हेअर यू फील सेफ' ही उक्ती कोकणपट्टी आणि सह्याद्रीला तंतोतंत लागू पडते. यासाठी 'झिरो कॅज्युअलिटी मिशन'च्या संदर्भात, वेगळ्या सकारात्मकतेची, सक्षमतेची आणि समन्वयाची गरज आहे.

अमिताभ बच्चन यांच्यावर धक्कादायक आरोप, 'या' प्रकरणात पाठवली कायदेशीर नोटीस

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

अभिनेते अमिताभ बच्चन आणि साऊथ स्टार प्रभास यांचा कल्की २८९८ एडी हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. सिनेमाचे कलेक्शन ६०० कोटींकडे गेलं असून अनेक मोठे रेकॉर्ड देखील मोडीस निघाले आहेत. एकीकडे सिनेमाची क्रेझ वाढत असून दुसरीकडे मात्र सिनेमा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. काँग्रेसचे माजी नेते आचार्य प्रमोद कृष्णम यांनी सिनेमाचे कलाकार आणि निर्मात्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. चित्रपटात धार्मिक गोष्टींशी छेडछाड केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन
संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
Email :- dirmum.pg@mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र:- ०२२-२२०१६८५२
ई-निविदा सुचना क्र.०५ सन २०२४-२०२५

संचालक, उपवने व उद्याने,मुंबई यांचे कार्यालय, २ रा मजला, मझेबान रोड, फोर्ट, मुंबई -४००००१, दुरध्वनी क्रमांक:- ०२२-२२०१६८५२ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या कंत्राटदारांकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संचालक, उपवने व उद्याने, महाराष्ट्र राज्य, फोर्ट, मुंबई यांनी राखून ठेवला आहे अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत रक्कम रुपये
१.	नाशिक येथील गोल्फ क्लब विश्रामगृहाच्या शिवनेरी, प्रतापगड,रायगड आणि सिंहगड इमारती) परिसरात उद्यानाची देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. (ऑगस्ट -२०२४ ते जुलै-२०२५ एकुण १२ महिन्यांच्या कालावधीसाठी)	रु. ११,७२,४९७/-
२.	मुख्य न्यायाधीश बंगला (सौदामिनी), सिव्हिल लाइन्स, नागपूर यांच्या आवारातील बागेची देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. (सप्टेंबर-२०२४ ते ऑगस्ट-२०२५ म्हणजेच १२ महिन्यांसाठी)	रु. १४,९३,४४०/-
३.	टाऊन हॉल कोल्हापूर येथील आवारातील जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र, प्रेस गार्डन परिसर, ग्लास हाऊसजवळ, महादेव मंदिराजवळचा परिसर, संग्रहालय कार्यालयासमोरील परिसर, कोर्ट कंपाऊंडला लागून असलेला परिसरातील उद्यानांची देखभाल व दुरुस्ती करणेबाबत. (ऑगस्ट -२०२४ ते जुलै-२०२५ एकुण १२ महिन्यांच्या कालावधीसाठी)	रु. १७,९७,३८४/-
४	रायवुड पार्क लोणावळा पुणे येथे नियमित देखभालीसाठी अकुशल कामगार (मजूर) पुरविणे (ऑगस्ट -२०२४ ते जुन-२०२५ एकुण ११ महिन्यांच्या कालावधीसाठी)	रु. ०८,७२,४१४/-

(एकुण ४ कामे)
ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.२३/०७/२०२४ सकाळी १०.३० पासून ते दि.३०/०७/२०२४ रोजी १८.००
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दि.०१/०८/२०२४ रोजी १५.३० वाजता
खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
mahatenders.gov.in
जा.क्र./संउबउमुं/ले.शा./ई-नि.प्र./२४-२५/ 9950
संचालक यांचे कार्यालय,
उपवने व उद्याने, बांधकाम भवन,
२ रा मजला, २५ मझेबान रोड,
फोर्ट,मुंबई :- ४०० ००१
दुरध्वनी क्र :- ०२२-२२०१६८५२
Email-dirmum.pg@mahapwd.com
दिनांक :- 25/07/24
संचालक
उपवने व उद्याने
महाराष्ट्र राज्यमुंबई ,
डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/ १११९

रेल्वे मार्गावर दररोज सरासरी तीन - चार आत्महत्या, आत्महत्या करण्यात पुरुषांचे प्रमाण अधिक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

कौटुंबिक वाद, कामाचा ताण, आर्थिक अडचण, आजारपण, नैराश्य, प्रेमभंग आदी कारणामुळे अनेक जण आत्महत्येचा पर्याय निवडतात. अनेक जण मध्य किंवा पश्चिम रेल्वे मार्गावर धावती लोकल अथवा लांबपल्ल्याच्या गाड्यांसमोर उडी मारून आत्महत्या करतात. गेल्या सहा महिन्यांत मध्य आणि पश्चिम रेल्वेवर ५१ जणांनी आत्महत्या केली असून त्यात ४७ पुरूष आणि ४ महिलांचा समावेश आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर दररोज सरासरी तीन ते चार जण आत्महत्या करीत असल्याचे समोर आले आहे.

धकाधकीच्या दैनंदिन जीवनात विविध कारणांमुळे अनेक जण नैराश्याने ग्रासले आहेत. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रेमाला कुटुंबाकडून होणारा विरोध, कार्यालयातील कामांचा ताण, अतिकामामुळे येणारा तणाव, मानसिक आजार, जवळचे कोणी नसणे, व्यसन आदी विविध कारणांमुळे अनेक जण आत्महत्येसारखे पाऊल उचलतात. आत्महत्या करण्यासाठी रेल्वेचा पर्याय निवडतात. जानेवारी ते जून २०२४ या कालावधीत मध्य रेल्वेवर ३४ जणांनी आत्महत्या केली. यात ३१ पुरूष आणि ३ महिलांचा समावेश आहे. तर, याच कालावधीत पश्चिम रेल्वेवर १७ जणांनी आत्महत्या केली. यात १६ पुरूष आणि १ महिलेचा समावेश आहे. मध्य रेल्वेवर सर्वाधिक आत्महत्या कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाल्या असून तेथे २० जणांनी आत्महत्या केली आहे. तर, पश्चिम रेल्वेवर पालघर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक म्हणजे १२ जणांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.

आत्महत्या करणाऱ्यांमध्ये महिलांच्या तुलनेत पुरुषाची संख्या अधिक आहे. आत्महत्या करण्याचा प्रयत्न महिलाही करतात. मात्र, आत्महत्या करण्यात पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. पुरुष रेल्वे रूळांवर झोपून किंवा धावत्या

लोकल, एक्स्प्रेससमोर उडी मारून आत्महत्या करतात. तर, महिला हाताची नस कापून, औषधाची अतिरिक्त मात्रा घेऊन आत्महत्या करतात. रेल्वे मार्गावर धावत्या गाडीसमोर उडी मारून आत्महत्या करण्यात महिलांचे प्रमाण कमी आहे. अनेक वेळा तांत्रिक बिघाडामुळे लोकलचा खोळंबा होतो. तर अनेक वेळा कोणताही तांत्रिक बिघाड, अपघात झाला नसताना देखील लोकल विलंबाने धावत असते. लेटलतीफ कारभारामागे आत्महत्येच्या घटना हे एक कारण आहे. धावत्या रेल्वेसमोर उडी मारणे, ओव्हरहेड वायरला स्पर्श करणे, धावती रेल्वे पाहून रेल्वे रुळावर झोपून आत्महत्या करण्याच्या घटना घडतात. या घटनांचा फटका लोकल सेवेला बसत असल्याचे उघडकीस आले आहे. तणावग्रस्त व्यक्ती आत्महत्येसाठी सोपा मार्ग म्हणून धावत्या लोकल समोर उडी मारण्याचा पर्याय निवडतात. आत्महत्या केल्यानंतर संबंधित घटनेची माहिती मध्य रेल्वेच्या संबंधित विभागाला कळायला, कामगारांमार्फत तेथील मृतदेह उचलण्यास बराच अवधी लागतो. त्यामुळे आत्महत्येच्या एका घटनेमुळे त्या दिशेकडे जाणाऱ्या सर्व लोकल विलंबाने धावतात. लोकल शेवटच्या स्थानकात पोहचण्यास, तेथून पुन्हा दुसऱ्या स्थळी जाण्यास विलंब होतो. त्यामुळे आत्महत्येच्या प्रकरणामुळे रेल्वे विस्कळीत होते. १ जानेवारी ते ३० जून २०२४ या कालावधीत मध्य आणि पश्चिम रेल्वेवर एकूण ५१ जणांनी आत्महत्या केल्याची नोंद करण्यात आली आहे. यात ४७ पुरूष आणि ४ महिलांचा समावेश आहे. तसेच मध्य रेल्वेवर ३४ जणांनी (३१ पुरुष आणि ३ महिला), तर पश्चिम रेल्वेवर १७ जणांनी आत्महत्या (१६ पुरुष आणि १ महिला) केली. १ जानेवारी ते ३० जून २०२३ या कालावधीत मध्य आणि पश्चिम रेल्वेवर एकूण ५० आत्महत्येच्या प्रकरणांची नोंद झाली. यात ४१ पुरूष आणि ९ महिलांचा समावेश आहे.

बांगलादेशी महिलेची घुसखोरी, बोगस कागदपत्रे बनवून वास्तव्य; प्राथमिक पोलीस तपासात धक्कादायक प्रकार उघड

■ **कराड : विशेष प्रतिनिधी**

बांगलादेशातून पश्चिम बंगालमार्गे घुसखोरी करुन बनावट जन्म दाखला, आधारकार्ड तयार करुन एका बांगलादेशी महिलेने

कराड तालुक्यातील शिरगाव (वडगाव) येथे वास्तव्य केल्याचे खळबळजनक प्रकरण पोलिसांच्या प्राथमिक तपासातून पुढे आले आहे.

रिया रेहमान बिस्वास (वय ३३, मुळ रा. ग्राम गाजीरहट, पारमचोदूपूर जि. खुलना- बांगलादेश) ऊर्फ रिया सोहाक शेख ऊर्फ रिया विक्रम कदम सध्या रा. शिरगाव (वडगाव), ता. कराड) असे घुसखोरी करणाऱ्या महिलेचे नाव आहे. तिच्या विरोधात उंब्रज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर महिलेने १२ वर्षांपासून भारतात अवैद्यरित्या पश्चिम बंगालमार्गे घुसखोरी करुन बनावट जन्म दाखला, आधारकार्ड तयार करुन वास्तव्य करत असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय जयसिंग धुमाळ यांनी याबाबत उंब्रज पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याबाबतची माहिती अशी की, संशयित महिला ही शिरगाव (वडगाव) गावच्या हद्दीत वास्तव्य करत असल्याची माहिती वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना मिळाली, त्यांनी ही माहिती उंब्रज पोलिसांना कळवली. यावर वरिष्ठांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे यांनी पोलीस कॉन्स्टेबल साळे, धोंगडे, होमगार्ड गाडे, पाटील, जिल्हा विशेष शाखेचे जमादार भोसले यांचे पथक तयार करून पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. या पाहणीदरम्यान सदर पथकाला संशयित महिला मिळून आली. पोलिसांनी केलेल्या चौकशीत वरील बाबींचा उलगडा झाला आहे. यामध्ये वसई, विरार, पनवेल, नवी मुंबई याठिकाणी वास्तव्य करत असताना, पहिल्या पतीने तिच्या नावाचा बनावट जन्म दाखला, आधारकार्ड अशी कागदपत्रे तयार करुन घेतली.

स्क्रॅप खरेदीतून उद्योजकाला कोट्यवधींना चुना, नाशिकमधील धक्कादायक प्रकार

■ **नाशिक : विशेष प्रतिनिधी**

स्क्रॅप खरेदी करताना वजन काटे मालकांशी संगनमत करून वजनात फेरफार करीत उद्योजकाची कोट्यवधीची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी फसवणूक करणाऱ्या संशयितांविरोधात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तीनही वजनकाटे सील करण्यात आले आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत अरुण संगई (६५, रा. सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक) यांनी फिर्याद दिली आहे. संगई यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गेल्या २० वर्षापासून संशयित अभिषेक शर्मा (३३) याचे संजीवनगर येथे स्क्रॅपचे दुकान आहे. त्याचे अंबड एमआयडीसीमधील महाराष्ट्र वे ब्रिज, जानकी वे ब्रिज व एक्स्लो पॉईंट, इंडस्ट्रियल वे ब्रिज या फर्मचे मालक यांच्याशी चांगले संबंध आहे. त्यामुळे संशयित शर्मा याने तीनही वजनकाटे मालकांशी संगन्मत करून फिर्यादी यांची फसवणूक केली. संशयिताने संगई यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या इलेक्ट्रो फॅब इनोव्हेशन इंडिया प्रा. लि., तसेच प्लॉट नंबर ६ वर असलेल्या ऊरजयंत इंजिनिअरिंग प्रा. लि. या कंपनीमधील स्क्रॅप मटेरियल वेळोवेळी खरेदी केले.

स्क्रॅप मटेरियल कमी दाखवून फसवणूक

तसेच कंपन्यांमधून गाडीमध्ये स्क्रॅप भरल्यानंतर संशयित वजन काट्यांवर जाऊन बनावट पावत्या तसेच वजनामध्ये फेरफार करीत स्क्रॅप मटेरियल कमी दाखवून फसवणूक केली. एका स्क्रॅपच्या गाडीमध्ये तब्बल तीन ते चार टन वजन कमी दाखवले. दरम्यान कंपनी मालक संघई यांनी वजन काटा पावत्यांची तपासणी केल्यानंतर त्यांना आपली फसवणूक होत असल्याचा प्रकार लक्षात आला. त्यामुळे त्यांनी अंबड पोलीस ठाण्यात संशयित शर्मा यांच्या विरोधात फिर्याद दिली.

तीन वजन काटे सील

त्यानुसार पोलिसांनी संशयितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात संशयित शर्मा याने मागील वीस वर्षात संघई यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आल्याचे असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांनी वजनामध्ये फेरफार करणारे तीनही वजन काटे तत्काळ सील केल्याचे पोलिसांनी सांगितले.

मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता

औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांची कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्या स्क्रॅप व्यावसायिकावर कोणाचा रायकीय वरदहस्त आहे ? या दृष्टीनेही पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या घटनेने सर्वच कंपनी व्यवसायिक जागृत झाले आहेत. त्यामुळे असे आणखी काही प्रकार समोर येण्याची शक्यता असून अजूनही मोठे मासे गळाला लागण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे.

अल्पवयीन मुलींना देहविक्री करण्यास भाग पाडणाऱ्या तिघांना अटक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

पैशांचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलींना देहविक्री करण्यास भाग पाडणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेने कुर्ला परिसरातून अटक केली. अटक आरोपीमध्ये दोन महिलांचा समावेश असून याप्रकरणी कुर्ला पोलीस अधिक तपास करीत आहेत. एक टोळी पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहारमधून काही अल्पवयीन

मुलींना मुंबईत देहविक्रीसाठी घेऊन येत असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट ५ च्या अधिकाऱ्यांना मिळाली. त्यानुसार अधिकाऱ्यांनी गुरुवारी कुर्ला रेल्वे स्थानकाबाहेर सापळा रचला होता. मिळालेल्या वर्णनाच्या दोन महिला तेथे आल्या. त्यांच्यासोबत अन्य एक इसम आणि दोन अल्पवयीन मुली होत्या. पोलिसांनी तत्काळ या सर्वांना ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलींची सुटका करून तिन्ही आरोपींना अटक केली.

गुन्हेगाराशी असलेली मैत्री अंमलदाराच्या अंगलट! बजरंगवाडी दंगलीप्रकरणी अटक; मोक्कांतर्गत कारवाईची शक्यता

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात बजरंगवाडीत झालेल्या राड्याप्रकरणी सराईत गुन्हेगाराशी असलेले संबंध आणि त्या राड्यात केलेल्या हाणामारीत प्रत्यक्ष सहभाग असल्याने पोलीस अंमलदाराला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी शहर पोलिसांकडून कसून तपास सुरू असून, पोलीस - गुन्हेगारांच्या संबंधातील आणखी एकप्रकरण यानिमित्ताने उघडकीस आले आहे. दरम्यान, याप्रकरणातील संशयितांविरोधात मोक्काअंतर्गत कारवाई करण्याचे संकेत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

नासर्डी नदीकिनारी असलेल्या बजरंग वाडीमध्ये गेल्या आठवड्यात दोन गटामध्ये रात्रीच्या वेळी हाणामारीची घटना होऊन राडा झाला होता. याप्रकरणी दोन्ही गटातील सुमारे ३० जणांविरोधात दंगलीचा गुन्हा मुंबई नाका पोलिसात दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना सराईत गुन्हेगार जुबीन सय्यद (रा. खडकाळी) याच्या टोळीने बजरंगवाडीत जाऊन मारहाण केली. या मारहाणीच्या घटनेमध्ये आडगाव पोलीस ठाण्यातील गुन्हेशोध पथकातील पोलीस अंमलदार इरफान मन्सुर शेख (रा. वडाळागाव) याचाही समावेश असल्याने पोलीस तपासात निष्पन्न झाले. याप्रकरणी मुंबई नाका पोलिसांनी इरफान यास अटक केली आहे. एका दिवसाच्या

पोलीस कोठडीनंतर त्याची आज (ता. २०) न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार इरफान शेख याची सराईत गुन्हेगार जुबीन सय्यद याच्याशी मैत्री असून, तो खबरी असल्याचे समोर आले आहे. परंतु तरीही मारहाणीच्या घटनेमध्ये अंमलदार इरफान याचा प्रत्यक्ष सहभाग स्पष्ट झाला असून, त्यात तोही जखमी झाला होता. याचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांकडून कारवाई करण्यात आली आहे. इरफानचे वडीलही सेवानिवृत्त पोलीस अंमलदार असून, भाऊ पोलीस कर्मचारी आहे. दरम्यान, या प्रकरणात राजकीय दबावही असल्याची चर्चा पोलीस वर्तुळात आहे.सराईत गुन्हेगार जुबीन सय्यद याच्यावर तडीपारीचीही कारवाई यापूर्वी झाली आहे.

मुंबईतील प्राणीप्रेमी महिलेवर बलात्काराचा प्रयत्न, जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला बिहारमधून अटक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

३८ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर तिला मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका वॉचमनला मुंबई पोलिसांनी मंगळवारी (१६ जुलै) अटक केली आहे. ही ३८ वर्षीय महिला ब्रँड मॅनेजमेंट अँड बिजनेस डेव्हलपमेंट फर्मची वरिष्ठ कर्मचारी असून सोमवारी मढ, मालाडमध्ये तिच्याबरोबर ही घटना घडली. या घटनेतील आरोपी २८ वर्षांचा असून त्याला बिहारमधून अटक करण्यात पोलिसांच्या पथकाला यश आले आहे. डीसीपी झोन-११ आणि मालवणी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक चिमाजी आढाव यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिसांच्या पथकाने आरोपीला बिहारमधून अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा आरोपी मालाड (पश्चिम) मढ परिसरातील व्यासवाडीमधील एका प्रोडक्शन हाऊसमध्ये केअरटेकर आणि वॉचमन म्हणून काम करत होता. प्रोडक्शन हाऊस असलेल्या बंगल्याच्या शेजारच्या बंगल्यामध्येच ती पीडिता राहते. पीडिता प्रचंड प्राणी प्रेमी असून तिच्याकडे दहा-बारा मांजरे पाळलेली आहेत. तिच्या याच प्राणी प्रेमाचा गैरफायदा उचलण्याचा प्रयत्न आरोपीने केला. पोलिसांमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी आरोपीने पीडित महिलेला म्हटले की, तिने पाळलेली तीन मांजरे त्यांच्या प्रोडक्शन हाऊसच्या बंगल्यामध्ये आली आहेत आणि तिने त्यांना घेऊन जावे. जेव्हा पीडित महिला त्या प्रोडक्शन हाऊसमध्ये तिच्या मांजरांना आणायला गेली; तेव्हा त्या आरोपी वॉचमनने तिला पकडले आणि तिच्याकडे शारीरिक सुखाची मागणी लावून धरली.

पीडित महिलेने प्रतिकाराचा प्रयत्न केला तेव्हा तो तिला जीवे मारण्याची धमकी देऊ लागला. त्याने तिला बंगल्याच्या आतील खोलीमध्ये जबरदस्ती नेण्याचा प्रयत्न केला. ती प्रतिकाराचा प्रयत्न करत राहिली पण आरोपीने तिच्याकडून जबरदस्तीने शारीरिक सुख मिळवण्याचा प्रयत्न सुरुच ठेवला. जेव्हा तिने जोरदार प्रतिकार चालवला तेव्हा त्याने तिच्यावर चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती पोलिसांनी दिली. या सगळ्या झटापटीमध्ये पीडित महिलेच्या मानेवर आणि पोटावर गंभीर जखमा झाल्या आहेत. या आरोपीने महिलेला प्रोडक्शन हाऊसच्या एका खोलीमध्ये बंद केले आणि तो तिथून पळून गेला. पुढे पोलीस म्हणाले की, या महिलेने जवळच राहणाऱ्या आपल्या एका मित्राला फोन करुन मदत मागितली. पीडित महिलेचा मित्र तातडीने आला आणि त्याने तिची सुटका करुन तिला कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये नेले. त्यानंतर पोलीस तातडीने दवाखान्यात हजर झाले आणि त्यांनी तिचा जबाब नोंदवला. दोन दिवसांच्या उपचारानंतर पीडित महिलेला दवाखान्यातून घरी पाठवण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरिक्षक आढाव म्हणाले की, 'आरोपीला मंगळवारी बिहारमधून अटक करण्यात आले असून त्याला बुधवारी मुंबईमध्ये आणण्यात आले. त्याला त्याच दिवशी न्यायालयासमोर सादर केले असून त्याला २२ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.'

आरोपीवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ६२ (गुन्हा करण्याचा प्रयत्न), ६४ (बलात्कार), ७४ (विनयभंग), ७५ (लैंगिक छळ), १०९ (हत्येचा प्रयत्न), ११८ (१) (धोकादायक शस्त्राने दुखापत करणे किंवा गंभीर दुखापत करणे), १२७ (२), (जबरदस्तीने डांबून ठेवणे) अशा कलमांचा समावेश आहे.

बेवारस मृतदेह

चारकोप पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ६५/२०२४ कलम- १९४ भा.ना.सु. संहिता २०२३ अन्वये बेवारस पुरुष वय अंदाजे- ४५ वर्षे, बांधा- सडपातळ, वर्ण- सावळा, उंची- अंदाजे ५ '६'इंच, चेहरा-गोल, असलेला इसम चारकोप पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये हिंदुस्थान नाका, चारकोप कांदिवली

पा. येथे बेशुद्धावस्थेत मिळून आला असून त्यास उपचाराकामी शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दाखलपूर्व मयत घोषित केले. नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

संपर्क-
साजिद मन्सुरी, पोलीस उपनिरीक्षक
चारकोप पोलीस ठाणे, मुंबई
मोबाईल क्र. : ९९७०८३८२२२
पोलीस ठाणे क्रमांक :
०२२२८६७६५८१

बेवारस मृतदेह

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ८३/२०२४ कलम- १७४ फौ. दं.प्र.संहिता १९७३ अन्वये बेवारस महिला नामे नूरजहाँ, वय अंदाजे- ४८ वर्षे, बांधा- मध्यम, उंची- अंदाजे ५ '६'इंच, रंग- गोरा, केस काळे, चेहरा- चौकोनी असलेली महिला समतानगर पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आली असून उपचाराकामी शताब्दी रुग्णालयात दाखल

करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

आश्विनी हिरे, पोलीस उपनिरीक्षक
समतानगर पोलीस ठाणे, मुंबई
मोबाईल क्र : ९५८८४०४७३४
पोलीस ठाणे क्रमांक :
०२२२८८७६११९

पनवेल महापालिकेच्या कंत्राटी कर्मचाऱ्याविरोधात पोलिसांत तक्रार

■ **पनवेल: विशेष प्रतिनिधी**

नवीन पनवेल येथील कोंबडी विक्रेत्याला पनवेल पालिकेच्या धूर फवारणी करणाऱ्या कंत्राटी कामगाराने मारहाण केल्याची घटना रविवारी दुपारी घडली आहे. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात कोंबडी विक्रेत्याच्या तक्रारीनंतर पनवेल महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कामगाराविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रमोद बनकर असे या कंत्राटी कामगाराचे नाव आहे. नवीन पनवेल येथील पंचशीलनगर झोपडपट्टीमध्ये संजय परमार यांच्या कोंबडी विक्रीच्या दुकानात ३२ वर्षीय अन्वर शेखर हे काम करतात. रविवारी दुपारी एक वाजता अन्वर हे दुकानात असताना कचरा घेऊन जाणारी घंटागाडी तेथे आली. अन्वर यांनी दुकानातील कचरा घंटागाडीत टाकताना त्याच ठिकाणी धूर फवारणी करणारा प्रमोद बनकर हा काम करत होता. अन्वरने कोंबडीची गाडी रस्त्यालगत उभी केल्याने कोंबड्यांची गाडी पुढे घेण्यावरुन भांडणे झाली.

पान १ वरून...

राज्यात आणखी पाच...

सध्या बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे विदर्भ, कोकण, घाटमाथ्यावर दमदार पाऊस होत आहे. कोकण, घाटमाथा आणि विदर्भात जोरदार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. उर्वरित राज्यामध्ये हलक्या सरी कोसळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. ओरिसा आणि छत्तीसगड परिसरावर कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. हा कमी दाबाचा पट्टा हळूहळू कमी होत आहे. मॉन्सूनचा आस दक्षिणेकडे कायम आहे. दक्षिण गुजरातपासून ते उत्तर केरळ किनाऱ्याला समांतर कमी दाबाचा पट्टा आणि महाराष्ट्राच्या मध्य भागातून पूर्व पश्चिम वाहणाऱ्या परस्पर विरोधी वाऱ्यांचे जोड क्षेत्र सक्रिय आहे. कोकण, विदर्भासह सध्या घाटमाथ्यावर पावसाची जोरदार हजेरी लागत आहे.

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात...

जुनी पेन्शन लागू करण्यासाठी सरकारी कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून आग्रही आहेत. या कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून सातत्याने सरकारकडे जुनी पेन्शन योचजना लागू करण्याची मागणीही केली जात होती. आता, विरोधी पक्षातील नेत्यांनी कर्मचाऱ्यांच्या या मागणीला पाठिंबा दर्शवत संसद सभागृहात हा प्रश्न उपस्थित केला. खासदार प्रणिती शिंदेनी उपस्थित केलेल्या या प्रश्नावर सरकारने लेखी उत्तर दिले असून जुनी पेन्शन लागू करण्याचा कुठलाही विचार नसल्याचं म्हटलं आहे.

'मनोज जरांगेंसाठी लाडका...

त्यामुळे जर मराठा समाज ओबीसीमध्ये आला तर २७ टक्क्यांची चौकट राहणार नाही', असं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं आहे. 'मराठा समाजाच्या ओबीसीमध्ये येण्याच्या मागणीविरोधात आम्ही छातीची ढाल करून पुढे येत आहोत. त्यामुळे तुम्ही आमच्यात बुद्धीभेद करण्याचा प्रयत्न करु नका. ओबीसींचं हे आंदोलन उभं राहत आहे. या आंदोलनाला तोडा आणि फोडा अशा पद्धतीचं काम करण्याचा प्रयत्न कोणीही करु नये. ओबीसींच्या सामाजिक न्याय हक्कांच्या योजनासांठी महाराष्ट्र सरकारच्या बजेटमध्ये एक टक्क्याचंही बजेट मिळत नाही. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही सांगावं. एक टक्का बजेट मिळत नसेल तर मग ओबीसींचं सामाजिक परिवर्तन कसं होणार?', असा सवाल लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केला.

मराठा समाजाला...

त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणीही दूर होतील. मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला १३ जुलैपर्यंतची मुदत दिली होती. मात्र, आरक्षणाची डेडलाईन संपल्याने मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसले आहेत. २० जुलैपासून मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केलं आहे.

शरद पवार हे भारतीय राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके तर उद्धव ठाकरे हे औरंगजेब फॅन क्लबचे नेते, अमित शाहांची बोचरी टीका

■ पुणे : अभिजीत येरल्लू

भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके कोण असेल तर शरद पवार आहेत अशी टीका अमित शाह यांनी केली आहे. भ्रष्टाचाराला संस्थात्मक रुप देण्याचे काम हे शरद पवार यांनी केलं आहे अशी घणाघाती टीका अमित शाह यांनी पुण्यात भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत केली.

एवढंच नाही तर जेव्हा जेव्हा राज्यात भाजपाची सत्ता आली तेव्हा मराठ्यांना आरक्षण मिळालं आहे, जेव्हा शरद पवार यांची सत्ता येते तेव्हा मराठा आरक्षण जाते. २०१४ ला भाजपा सत्तेत आली मराठा आरक्षण आलं, २०१९ ला शरद पवार सत्तेत आले मराठा आरक्षण गेलं तेव्हा तुम्ही ठरवा काय करायचं ते असं अमित शाह यावेळी म्हणाले.

पुण्यात भाजपाच्या दोन दिवस राज्य कार्यकारिणीचे आयोजन केले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री, भाजपाचे नेते अमित शाह यांच्या उपस्थित झाला. ३९ मिनिटांच्या भाषणात अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली, त्यांना प्रमुख लक्ष्य केले. काँग्रेस काळात, शरद पवार केंद्रात मंत्री असतांना महाराष्ट्रावर कसा अन्याय झाला याचा पाढा शाह यांनी वाचला. २०१४ ते २०१९ हा कार्यकाळ महाराष्ट्राच्या इतिहासात विकासासाठी सर्वात जास्त लक्षात राहिल असं सांगत त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची स्तुती केली.

शरद पवार यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले, त्यांच्यावर सडकून टीका केली. ' कसाबला बिर्याणी खायला देणाऱ्या काँग्रेससोबत उद्धव ठाकरे गेले आहेत, याकुब मेननला सोडण्याची मागणी करणाऱ्यांबरोबर ठाकरे बसले आहेत, झाकिर नाईक यांना शांततादूत बवनण्यांच्या मांडीवर उद्धव ठाकरे बसले आहेत, इइघ या संघटनेला पाठिंबा देणाऱ्यांचा मांडीला मांडी लावून उद्धव ठाकरे बसले आहेत, संभाजीनगरला विरोध करणाऱ्यांना पण हे साथ देत आहेत, यांना लाज वाटली पाहिजे ' अशी टीका अमित शाह यांनी यावेळी केली. राज्यात ' औरंगजेब फॅन क्लब ' म्हणजे कोण तर ते म्हणजे महाविकास आघाडी. आणि या औरंगजेब फॅन क्लबचे नेते आहेत उद्धव ठाकरे अशी बोचरी टीका अमित शाह यांनी केली. पुण्यात गेले दोन दिवस भाजपाच्या राज्य कार्यकारिणीचे आयोजन केले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री, भाजपाचे नेते अमित शाह यांच्या भाषणाने झाला. त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी तयारीला लागण्याच्या सूचना केल्या. यावेळी पण भाजपाच्या नेतृत्वाखाली महायुती पुन्हा सत्तेत येईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.

द्रुतगती महामार्गावर अपघाताच्या वेळी सुरक्षेसाठी फक्त सहा पोलीस!

■ पनवेल : सतिश सोनावणे

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शिवकर परिसरात सोमवारी रात्री झालेल्या भीषण अपघातामुळे सरकारी यंत्रणेतील काही त्रुटी उघड झाल्या आहेत. यात आषाढी वारीसाठी भाविकांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर द्रुतगती मार्गावर आल्यावरून शंका उपस्थित केल्या जात आहेत. तर, या मार्गावरील ४४ किलोमीटरच्या टप्प्यात महामार्ग वाहतूक पोलीस विभागाचे अवघे सहा कर्मचारी मध्यरात्री गस्तीवर असल्याचे स्पष्ट झाले आहे. सोमवारी मध्यरात्री सुमारे ४४ किलोमीटरच्या द्रुतगती मार्गावरील गस्तीसाठी सहाच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

सहापैकी चार पोलीस कर्मचारी वाहन गस्तीवर होते. तर अन्य दोन जण पोलीस नियंत्रण कक्षात होते, अशी माहिती सूत्रांनी दिली. द्रुतगती मार्गावर प्रतिबंधित वाहन रोखण्यासाठी कोणतीही यंत्रणा महामार्ग पोलिसांकडे उपलब्ध नव्हती, असे चौकशीअंती स्पष्ट झाले. द्रुतगती महामार्गाला कळंबोली येथून आरंभ होतो. द्रुतगती मार्गावर प्रतिबंधित असलेल्या ट्रॅक्टरने प्रवेश कसा केला,याची माहिती देणारी कोणतीही यंत्रणा महामार्ग वाहतूक पोलिसांकडे नाही. चालकाने अनवधानाने प्रतिबंधित वाहन द्रुतगती मार्गावर नेल्यास ते रोखणारी यंत्रणा वाहतूक पोलिसांकडे नाही.

इंडियन नेव्हीत नोकरीचे आमिष दाखवून तरुणास तीन लाखांचा गंडा

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

भारतीय नौदलात चांगल्या पोस्टवर नोकरी लावून देतो असे सांगून एका महिलेस पुरुषाने तरुणाच्या कुटुंबास तीन लाख रुपयांचा गंडा घातला आहे. बनावट कागदपत्रे, प्रमाणपत्रे दाखवून दोघांनी हे पैसे उकळले. नोकरी लागलीच नसल्याने फसवणूक झाल्याचे कळाल्यावर अखेर कुटुंबाने न्यायालयात धाव घेतली. त्यानुसार न्यायालयाने मुंबई नाका पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अरविंद हिरालाल विश्वकर्मा(वय ३०) व ज्योती गांगुर्डे(वय २६, दोघे रा. गुरुकृपा अपार्टमेंट, श्रीरामनगर, आडगाव शिवार, हल्ली रा. बेलापूर, नवी मुंबई) अशी संशयितांची नावे आहेत. दोघांनी विवाह केल्याचे समोर येते आहे. कमलेश वालजीभाई पटेल (वय ५३, रा. प्रमेथ अपार्टमेंट, कल्पतरुनगर, अशोका मार्ग, नाशिक) यांच्या फिर्यादीनुसार, विश्वकर्मा व गांगुर्डे यांनी संगनमताने पटेल यांच्याशी ओळख वाढविली. त्यानंतर त्यांच्या मुलास 'इंडियन नेव्ही'त

संरक्षण दलाची केंद्रीय नोकरी आणि तीसुद्धा चांगल्या पोस्टवर लावून देण्याचे अमिष दाखविले. आमची थेट संरक्षण दलात ओळख आहे, असे सांगून त्याबाबतचे कागदपत्रे व फोटोज पटेल यांना दाखविले. पटेल यांचा विश्वास बसल्याने त्यांनी मुलाचे कागदपत्रे व फोटोज दोघांना दिले. त्यानंतर या संशयितांनी त्यांना नोकरीसाठी फार स्पर्धा असते. थोडेफार पैसे अधिकारी व तेथील क्लर्कला द्यावे लागतील, असे सांगून पैशांची मागणी केली. तसेच २४ जानेवारी ते २२ मार्च २०१९ या कालावधीत एकूण तीन लाख रुपये घेतले. दरम्यान, संशयित पैसे घेऊन पसार झाले. त्यांना संपर्क करुनही त्यांनी दाद दिली नाही. त्यामुळे, पटेल यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला. अखेर सुनावणीअंती न्यायालयाने वरील दोघांवर फसवणूकीसह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश मुंबईनाका पोलिसांना दिले. त्यानुसार उपनिरीक्षक निसार शेख तपास करत आहेत. संशयितांचा शोध सुरु आहे.

दोन कोटी रुपयांचे एमडी जप्त... नवी मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाची कारवाई

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

नवी मुंबई पोलिसांनी अंमली पदार्थ संबंधित मोठी कारवाई केली असून सदर कारवाईत १ किलो ४ ग्रॅम वजनाचे तब्बल २ कोटी रुपयांचे एमडी विक्री प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे. सलाउद्दीन अलाउद्दीन शेख (वय २१ वर्ष) आणि फजल जाफर खान(वय २१ वर्ष) असे अटक आरोपींची नावे असून दोघेही मुंबई माहीम येथे राहणारे आहेत. शीव पनवेल महामार्गावर वाशी येथे दोन व्यक्ती अंमली पदार्थ त्यांच्या ग्राहकांना देण्यासाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारावर गुन्हे शाखा सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक निरज चौधरी यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ, सचिन कोकरे, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर बनकर, रमेश तायडे, गणेश पवार,पोलीस नाईक अंकुश म्हात्रे, संजय फुलकर,राकेश आहिरे या पथकाने शीव पनवेल मार्गावर सानपाडा ते वाशी खाडी पूल दरम्यान सापळा लावला.

खबरीने दिलेली माहिती आणि आरोपींचे केलेल्या वर्णनानुसार दोन संशयित वाशी गाव बस थांब्यानजीक आढळून आले. त्यांच्या हालचाली संशयित व्यक्ती प्रमाणे असल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या कडे तब्बल १ किलो ४ ग्रॅम वजनाचा एम डी (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ आढळून आला. त्याचे बाजार मूल्य एकुण २ कोटी ८० हजार रुपये एवढे आहे. आरोपींच्या विरोधात गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील मुद्देमाल कोठुन आणला तसेच पाहिजे आरोपीचा शोध घेत घेतला जात आहे. गुन्ह्याचा पुढील अधिक तपास सपोनि सचिन कोकरे, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई करीत आहेत.

'भाषण चुरचुरीत करण्यासाठी त्यांना उद्धव ठाकरेंचं नाव घ्यावं लागतं', अमित शाह यांच्या 'त्या' टीकेला सुषमा अंधारेंचं प्रत्युत्तर!

■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी म्हणजे 'औरंगजेब फॅन क्लब' आहे आणि या औरंगजेब फॅन क्लबचे नेते हे उद्धव ठाकरे आहेत, अशी बोचरी टीका अमित शाह यांनी पुण्यातील भाजपाच्या मेळाव्यात बोलताना केली होती. त्यांच्या या टीकेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही आता अमित शाह यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. समाज माध्यमावर व्हिडीओ शेअर करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

आज अमित शहा यांनी पुण्यात येऊन जी मुक्ताफळ उधळली आहेत, त्यावरून हे स्पष्ट झाले आहे की, अमित शाह यांना आजही महाराष्ट्रात आल्यानंतर आपलं भाषण चुरचुरीत करण्यासाठी उद्धव ठाकरे यांचं नाव घ्यावं लागतं. त्याशिवाय त्यांना भाषणाची सुरूवात करता येत नाही आणि भाषण संपवता ही येत नाही, असं प्रत्युत्तर सुषमा अंधारे यांनी दिलं. तसेच अमित शाह यांनी ज्या पद्धतीने उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे, त्यानुसार महाराष्ट्रात भाजपापुढे उद्धव ठाकरे हेच सर्वात मोठं आव्हान आहे, हे स्पष्ट झाले, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी अमित शाह यांच्यावर टीका केली. अमित शाह यांनी त्यांच्या भाषणात अत्यंत थिल्लर भाषा यांनी वापरली आहे. हे दुर्दैवी आहे. संसदेत भाजपाचे खासदार रमेश भिदूडी यांनी जी सवंग भाषा वापरली होती. त्यापेक्षाही खालचा स्तर अमित शहा यांनी आज गाठला आहे, असे त्या म्हणाल्या.

सुषमा अंधारे यांच्याशिवाय ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनीही अमित शाह यांना लक्ष्य केलं. ज्यांनी जिना यांच्या कबरीवर जाऊन फुलं वाहिली आणि ज्यांनी निमंत्रण नसताना नवाज शरीफ यांच्या वाढदिवसाला जात त्यांना केक भरवला ते कोणत्या फॅन क्लबचे सदस्य आहेत? याचं उत्तर आधी अमित शाह यांनी द्यावं, अशी टीका अंबादास दानवे यांनी केली. खरं तर असे शाह महाराष्ट्रावर चालून येण्याच्या पहिली घटना नाही. आदीलशाह, कुतूबशाह त्यापैकीच एक शाह हे अमित शाह आहेत. पण अशा शाह यांना परत कसं पाठवायाचं, हे महाष्ट्राच्या मातीला चांगलं माहिती आहे, असेही ते म्हणाले.

मुंबई - गोवा महामार्गावरील खेड जगबुडी नदीवरील पुलाला पडले मोठे भगदाड

■ रत्नागिरी : आकांक्षा नार्वेकर

मुंबई – गोवा महामार्गावर सुरु असलेल्या रस्ते कामाची पुन्हा पोलखोल झाली आहे. रविवारी मुंबई गोवा महामार्गावरील खेड जगबुडी नदीवरील पुलाला

मोठे भगदाड पडल्याने खेड जगबुडी पुलावरची मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळासाठी थांबण्यात आली होती. दोन्ही बाजूकडील ही वाहतूक आता एकाच पुलावरून सुरु करण्यात आली आहे. खेड येथील जगबुडी नदीवरील पुलाला तडे जाऊन मोठे भगदाड पडल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून या मार्गावरील वाहतूक काही काळासाठी थांबवण्यात आली होती. या पुलाची पहाणी केल्यानंतरच पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. मात्र दुसऱ्या पुलावरून दोन्ही बाजूची वहातूक सुरु झाल्याने वाहतूक कोंडी संपली. चिपळूण येथील बहादूर शेख नाक्यावरचा पुलाचा काही भाग कोसळला होता. तसेच डीबीजे महाविद्यालयाची भिंत कोसळली.

वाई, कराड उत्तरेत कामाला लागा; उपमुख्यमंत्री अजित पवार; साताऱ्यात पदाधिकाऱ्यांना सूचना

■ सातारा : सम्यक कासारे

लोकसभा निवडणुकीत थोड्याफार दुर्लक्षामुळे झालेला दगाफटका लक्षात घेऊन यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पक्षाची बांधणी करावी. मतदारसंघनिहाय सर्व्हे केल्यानंतरच मेरिटनुसार उमेदवारीबाबत विचार केला जाईल. वाई व कराड उत्तर मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा हक्काचा मतदारसंघ असून, तेथून आपलाच उमेदवार निवडून आणण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केली. या वेळी त्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक घेऊन काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. आमदार मकरंद पाटील, दीपक चव्हाण, जिल्हा बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील, जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर,

कार्याध्यक्ष अमित कदम, प्रमोद शिंदे, प्रभाकर घार्गे, प्रदीप विधाते, संजीव देसाई आदी उपस्थित होते.

पवार यांनी सर्वांची मते जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सूचना केल्या. पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुकांची दुरुस्ती यावेळेस आपल्याला विधानसभेच्या निवडणुकीत करायच्या आहेत. त्यामुळे प्रत्येक मतदारसंघात पक्षाची बांधणी करा, महायुतीत जागा वाटपाबाबत सर्वांशी चर्चा होऊन निर्णय होणार आहे; पण आपली ताकद ज्या ठिकाणी जास्त आहे त्या जागा आपण हक्काने मागून घेऊ. साताऱ्यातील वाई कराड उत्तर हा मतदारसंघ आपल्या हक्काचा मतदारसंघ असून, तेथे आपली ताकद चांगली आहे. त्यामुळे या दोन्ही जागांवर आपलाच उमेदवार निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करायचे आहे. या मतदारसंघात विशेष लक्ष घाला. मतदारसंघनिहाय सर्वे केल्यानंतरच मेरीटनुसान उमेदवारीबाबत विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम करावे, जेणेकरून सामान्य जनतेला या योजनांचा लाभ मिळेल, असेही ते म्हणाले. बैठकीनंतर भाजपचे कराड उत्तरचे नेते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी उपमुख्यमंत्री पवार यांची राष्ट्रवादी भवनात येऊन भेट घेतली. या वेळी त्यांची कराड उत्तर मतदारसंघाविषयी चर्चा झाली. याबाबत कदम यांना विचारले असता आमची महायुती असून, आम्ही कामानिमित्त भेटू शकतो, यात राजकारण काहीही नाही, असे स्पष्ट केले.

विधानसभेसाठी शिंदे गटाच्या मोर्चेबांधणीला सुरुवात; महायुतीत १०० जागांसाठी आग्रही

■ मुंबई : नितीन देवळेकर

आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने ८० ते ९० जागांची मागणी केली असतानाच, शिवसेना शिंदे गटानेही महायुतीत १०० जागा मिळाव्यात, अशी मागणी पुढे केली आहे. दोन्ही मित्र पक्षांची मागणी लक्षात घेता भाजपच्या वाट्याला किती जागा येतील, असा प्रश्न भाजपच्या नेत्यांना पडला आहे. शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या नेत्यांची बैठक पार पडली. त्यात महायुतीत भाजपकडे किमान १०० जागा मिळाव्यात, अशी मागणी करण्यात आली. मुख्य नेता व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या बरोबर गेलेल्या अपक्षांसह ४८ आमदारांसाठी त्यांचे मतदारसंघ कायम ठेवणार असल्याचा विश्वास शिंदे यांनी दिला आहे. याशिवाय आणखी ५० मतदारसंघांची मागणी महायुतीत करण्यात येणार आहे. महायुतीत शिवसेनेची ताकद

असल्याने पक्षाला १०० जागा मिळाव्यात, अशी भूमिका मांडण्यात आली. राज्य सरकारच्या लाडकी बहीण, लाडका भाऊ, मोफत एसटी प्रवास, कृषी पंप वीज माफी, पीकविमासारख्या योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्याच्या सूचना शिंदे यांनी दिल्या आहेत.लोकसभा निवडणुकीत जागावाटपावरून झालेली दिरंगाई व त्यामुळे पक्षाला बसलेला फटका लक्षात घेऊन शिवसेना शिंदे गटाने व्यूहरचनेला सुरुवात केली आहे. तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीची ठाकरे गटाने तयारी सुरू केली आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईत शिवसेना-भाजप युतीत शिवसेनेने १९ जागा लढवल्या होत्या. १४ जागांवर शिवसेनेने विजय मिळविला. यातील आठ आमदार ठाकरे गटात तर सहा शिंदे गटात आहेत. ठाकरे गटाने सर्व मतदारसंघांतील इच्छुक उमेदवारांची यादी मागवली आहे. चार लोकसभा मतदारसंघांतील २४ विधानसभा मतदारसंघांवर ठाकरे गटाचा दावा कायम आहे.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा रंग 'गुलाबी'

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने कात टाकली असून पक्षाचे प्रतिमावर्धन करण्याची जोरदार तयारी चालवली आहे. त्याचाच भाग म्हणून विधानसभा निवडणुकीची प्रचार व प्रसिद्धीची रणनीती आखण्याचे काम एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. गुलाबी रंग ही पक्षाची खास ओळख ठसवण्यात येणार असून पक्षाचे सभा, कार्यक्रम यांमध्ये सर्वत्र गुलाबी रंग प्राधान्याने वापरण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे स्वत: अजित पवार यांनी गुलाबी रंगाचे जॅकेट वापरण्यास सुरुवात केली आहे. शरद पवार पक्षाध्यक्ष असताना पक्ष प्रसिद्धीचे काम

'जॉइंनिंग माइंडस' कंपनीकडे होते. पक्षाची फाटाफूट झाल्यावर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रसिद्धीची काम 'अनोखी' कंपनी पाहात होती. विधानसभेसाठी मोठ्या कंपनीच्या शोधात अजित पवार होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनकाळात पवार यांना 'डीझाईन बॉक्स' कंपनीने एक सादरीकरण दाखवले. नरेश आरोरा यांची ही कंपनी असून राजस्थान आणि कर्नाटकमध्ये या कंपनीने काँग्रेससाठी प्रचार अभियान राबवलेले आहे.

राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह घड्याळ आणि तिरंगी झेंडा यात बदल होणार नाही. मात्र पक्षाचा अधिकृत रंग यापुढे गुलाबी असणार आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाली असून पक्षाचे फलक, जाहिराती यावर गुलाबी रंगाला प्राधान्य देण्यात येत आहे. अजित पवार यापुढे पांढऱ्या कुर्त्यावर केवळ गुलाबी जॅकेट परिधान करणार आहेत. त्यासाठी डझनभर जॅकेट खास शिवून घेतली आहेत. जाहीर कार्यक्रमात अजित पवार यापुढे गुलाबी रंगाचा मफलर वापरतील. कंपनीच्या सूचनेप्रमाणे अजित पवार यांनी छातीवर घड्याळ हे राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह लावण्यास प्रारंभ केला आहे.

अर्थसंकल्पात केलेल्या घोषणाच्या प्रचारार्थ अजित पवार राज्यभर दौरे करणार आहेत. त्याचाच भाग म्हणून पुढच्या आठवड्यात पवार नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात आहेत.